


'जागतिक राजकारणाची तीस वर्षे' हा ग्रंथ दत्त आपटे यांनी युध्दकालातच लिहून पुरा केला व आचार्य जावडेकर, महामहोपाध्याय द.वा.पोतदार वगैरे तज्ज्ञांच्या नजरेला आणला. ग्रंथ प्रकाशित करणे, युध्दकालीन अडचणींमुळे लांबणीवर पडू लागले, व ग्रंथ दरसाल अपुरा वाटू लागला. युध्दोत्तर कालात जगाची दुसरी अधिकृत घडी बसविण्याचे काम लांबू लागल्याने ग्रंथ पुरा करण्याचे चिन्ह दिसेना. सांगलीच्याच काही तरुण व अुत्साही प्रकाशक मंडळींनी उचल खाल्ली; त्यात त्यांचे व्यासंगी विद्यार्थीच होते.

पुस्तकाला पॅलेस्टाअीन नाव देण्यात आले असले तरी सीरिया अिराक वगैरे निकटवर्ती अरब मुलखांचा समावेशही त्यात आहे. संकल्पित मूळ पुस्तकामधील 'मुस्लीम जगत' या सदरात मोडणारा काही भागच तातडीने प्रकाशित केला, त्याचे कारण म्हणजे 'यूनो' पुढील पॅलेस्टाअीनच्या फाळणीचा तत्कालीन प्रश्न हेच होय.

स्वातंत्र्यकाळातील भारतीयांची राजकारणाची आवड वाढती असल्याने पुढे येणाऱ्या प्रश्नांची ३० वर्षांची राजकीय पार्श्वभूमी लक्षात यावी म्हणून 'आशिया माला' सुरू करण्यात आली. तीमधून हिंदुस्थान, चीन-जपान, तुर्कस्थान-अिजिप्त, अित्यादी पुस्तके प्रसिध्द करण्याचा संकल्प होता; हे पुस्तक त्याची सुरुवात होती. तथापि 'आशिया माले'तील पुढची पृष्ठे ग्रंथाच्या विस्तारात लिहून तयार असूनही प्रकाशित होऊ शकली नसावीत. कोणताही विशिष्ट असा दृष्टिकोण न ठेवता, घडलेल्या राजकीय घटनांची सांगोपांग चर्चा आणि तीही विद्यार्थ्यांना उपयुक्त अशा पद्धतीने करण्याची लेखकाची मनीषा या पुस्तकातून उघड दिसते.

*गजानन हुद्दार यांच्या प्रकाश प्रेसमध्ये हे पुस्तक छापले, व मोहनराव माणगांवकर यांनी 'पत्रावळे प्रकाशन' म्हणून डिसेंबर १९४७ ला ते प्रकाशित केले. स्वातंत्र्यचळवळीत तुरुंग फोडून पळालेल्या 'सैनिकां'पैकी हुतात्मा अण्णासाहेब पत्रावळे यांचे नाव प्रकाशनाला देण्यातून या साऱ्यांची विचारदिशा व ध्येयधोरणे स्पष्ट होतात. लेखकाने 'माझे स्नेही श्री.ना.पं.थत्ते व सौ.मालतीबाई थत्ते यांना सप्रेम समर्पण...' या शब्दांत आरंभी कृतज्ञता व्यक्त केली आहे.*

| | प्रकरण | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | मुस्लिम जगत् | ३९६ |
| २ | अरब तक्रारींना उत्तर | ४०५ |
| ३ | सौदी अरबस्तान | ४०७ |
| ४ | इराक | ४१० |
| ५ | इराण | ४१५ |
| ६ | अफगाणिस्तान आणि समारोप | ४१९ |

# पॅलेस्टाईन

## १. मुस्लिम जगत : पॅ ले स्टा ई न

अरबांच्या खटपटींतून दोस्तांनी गेल्या महायुध्दानंतर तुर्कांची मुक्तता केली नसती तर तुर्कस्थानला आपले भवितव्य अितक्या यशस्वीपणे कधीच घडविता आले नसते. तुर्कांकडून काढून घेण्यात आलेल्या अरब प्रांतांचे दोस्त राष्ट्रे काय करणार होती हे अेक गूढ त्याकाळी होतेच. अरबांची मात्र कल्पना होती की, दोस्त राष्ट्रे युध्दानंतर आपले स्वातंत्र्य मान्य करून मोकळी होणार! आणि त्यासाठी म्हणूनच तर त्यांनी तुर्कांविरुध्द शस्त्र अुचलले होते. ब्रिटिशांचा अिजिप्तमधील मुख्य अधिकारी हेन्री मॅकमोहन याने मक्केचा सुलतान व महंमदाचा वंशज हुसेनी यास तुर्कांविरुध्द बंडाळी करण्यास चिथावणी दिली होती. याचा मोबदला म्हणून अेडनखेरीज सर्व अरबी द्वीपकल्पाचे स्वातंत्र्य दोस्तांनी मान्य करावे अशी मागणी हुसेनीने केली होती. बसरा, बगदाद, आलेप्पो, बेरूत या प्रांतांबाबत थोडीफार घासाघीस होअून शेवटी ब्रिटिशांच्या वतीने मॅकमोहनने हुसेनीला पुढील वचन दिले, ''मक्केच्या शेरीफाने मान्य केलेल्या मर्यादेतील अरबी मुलखातील स्वातंत्र्याला मान्यता व पाठिंबा देण्यात येअील.''

हेन्री मॅकमोहन व मक्केचा राजा हुसेन यांच्यामध्ये जो पत्रव्यवहार झाला तो पत्रव्यवहार ब्रिटिश परराष्ट्र कचेरीने दडपून टाकला, व अधिकृत रित्या तो अद्यापि प्रसिध्द होअू दिला नाही; परंतु 'पोस्ट डिस्पॅच' या अमेरिकन पत्राचे धूर्त प्रतिनिधी जॉन्सन यानी तो, मयत राजा फिजल यांचेकडून संपादन केला; व त्याचे फोटो प्रसिध्द केले. या पत्रव्यवहारांतील पहिले पत्र हुसेनीने मॅकमोहनला लिहिले आहे. तो लिहितो,

'१-७-१९१५ पुढील मर्यादेतील अरब मुलखांचे स्वातंत्र्य मान्य करण्यात येत असेल तर अरब लोक तुर्कांना दोस्तांविरुध्द मदत करण्यास तयार आहेत.' या पत्राला अुत्तर देताना मॅकमोहन म्हणतो, 'अरब व अिंग्लंड यांचे हितसंबंध फार निगडित असल्याने अरबांच्या या मागणीला अिंग्लंडचा मुळीच विरोध नाही. सरहद्दीचा प्रश्न नंतर सावकाशीने व अुभयतांच्या विचाराने सोडविता येअील.'

सप्टेंबर ९, १९१५ला पाठविलेल्या पत्रात हुसेन म्हणतो, 'सरहद्दीचा प्रश्न आधी सोडविणे अवश्य आहे व तो सर्व अरब स्वतंत्र होतील अशाच पध्दतीने सोडविला गेला पाहिजे'. हुसेनीने अरब मुलखांची सरहद्द या पत्रात पुढे स्पष्ट केली असून त्यात पॅलेस्टाअीन समाविष्ट आहे. फक्त अेडन मात्र त्याने ब्रिटिशांकडे राहण्यास संमती दिली आहे. या पत्राचे अुत्तर २४ ऑगस्ट १९१५ मध्ये मॅकमोहनकडून हुसेनीला मिळाले. तो लिहितो, ' ग्रेट ब्रिटनच्या वतीने मी आपणास असे आश्वासन देअू अिच्छितो की, आपण सुचविलेल्या मर्यादेतील अरब प्रदेशांचे स्वातंत्र्य आम्हाला मान्य आहे.' यानंतर १३ डिसेंबर १९१५ला पाठविलेल्या दुसऱ्या अेका पत्रात मॅकमोहन म्हणतो, 'अिंग्लंडने अरबांना स्वातंत्र्य

प्राप्त करून देण्याचे वचन दिले असल्याने, अिंग्लंड अरबांचे स्वातंत्र्य अमान्य करणारा असा कोणताच तहनामा तुर्कस्तान अगर जर्मनी यांच्याशी करणार नाही.'

अितक्या स्पष्ट शब्दांत देण्यात आलेली वचने अिंग्लंड युध्दोत्तर कालात मोडेल ही कल्पनाच अरबांना येणे शक्य नव्हते. युध्द जसजसे लांबू लागले तसतशी अरबांना दोस्तांच्या सद्हेतूंची शंका येअू लागली. अरब मुलखाबाबत अिंग्लिश फ्रेंचांचा गुप्त तह झाल्याच्या बातम्या येअू लागल्या; तर अिकडे रशियाच्या समाजसत्तावादी सरकारने या गुप्त तहाचा मसुदाच बेधडकपणे छापून टाकला. या करारान्वये मेसापोटेमिया व पॅलेस्टाअीनमधील दोन बंदरे ब्रिटिशांनी आपणासाठी राखून ठेविली होती व सीरियाचा किनारा, दमास्कस, आलेप्पो, मोसूल हे विभाग फ्रेंचांसाठी ठेवण्यात आले होते. अरबांचे स्वातंत्र्य म्हणजे अिंग्लिश फ्रेंचांनी आपसांत केलेली अरब मुलखाची विभागणी होय! अरबांना विस्मयाचा अेक जबरदस्त धक्का बसला. यानंतर ब्रिटिशांनी ज्यूंना आपण पुण्यभू पितृभू म्हणून अरबांचा पॅलेस्टाअीन देणार असल्याचे जाहीर केले; व अरब अंतःकरणात दुसरा तप्त शूल घुसविला. याशिवाय अिराकवर त्यांनी कबजा घेतला ते निराळेच.

शस्त्रसंधी झाला आणि अरबांना फिरून थोडीफार आशा वाटू लागली. युध्दाच्या घिसाडघाअीत व त्रासात कदाचित दोस्त राष्ट्रे आपणास दिलेली वचने विसरून गेली असतील, पण आता त्यांना त्यांची खास आठवण होअील, निदान आपण तरी त्यांना ती करून देअू या खुशीत ते होते. शिवाय विल्सनच्या १४ कलमांवर तहाची अिमारत अुभी राहणार असल्याने आपल्याला आपोआपच स्वातंत्र्य मिळणार ही आशा त्यांना होतीच. बोलून चालून अुंटावरचे शहाणे ते, दोस्तांचा तिढा त्यांना काय माहीत? 'प्रत्येक देशाचे भवितव्य तेथील लोकवस्तीच्या मर्जीवर ठरविण्यात येअील, झगडणाऱ्या राष्ट्रांना त्यात हात घालू दिला जाणार नाही' या विल्सनच्या वेदवाक्यावर आधारलेल्या तहाची ते मार्गप्रतीक्षा करीत होते. तुर्की साम्राज्यातील प्रत्येक देशाला त्यांच्या सुरक्षिततेची हमी देअून स्वायत्तताक बनविण्याची घोषणा करणारे विल्सनचे १२वे कलम तर अरबांना अधिकच अुत्साह देणारे होते.

गेली तीस वर्षे जगात न भूतो न भविष्यति अशी क्रांती घडून येत आहे. तिसरे महायुध्द झाल्याखेरीज दीर्घकालीन शांतियुगाचा लाभ जगास उपभोगावयास सापडणार नाही, अशा वेळी भारतासारख्या दुर्बळ देशांना जागतिक घडामोडींचा सूक्ष्म अभ्यास करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. गांधी नेहरू ही नावे जागतिक राजकीय नावांत मोडू लागली आहेत हे जरी खरे, तरी जगाच्या राजकीय पटावर भारतीय मुत्सद्दी आपले डाव खेळण्यास अद्यापि सर्वस्वी समर्थ झालेले नाहीत हेही खरे. पण तो समय मात्र जवळ आला आहे. अशा वेळी आमच्या डोळ्यादेखत घडत असलेल्या आणि घडून गेलेल्या जागतिक घटनांचा संकलित आणि सप्रमाण वृत्तांत आणि त्याचे विवरण आम्हास हरघडी मार्गदर्शक व उद्बोधक झाल्याशिवाय राहणार नाही.

श्री.दत्त आपटे यांनी जगाचा राजकीय चित्रपट परिश्रमपूर्वक चितारला आहे यात शंका नाही. विचाराला साधन म्हणून सर्वांना व विशेषतः विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग झाल्याशिवाय राहणार नाही, -किंबहुना त्यांनी हा ग्रंथ वाचल्याशिवाय राहू नये. मोठमोठ्या म्हणविणाऱ्या नि स्वयंयुध्दनिष्ठ राष्ट्रांच्याहून मानवतेच्या दृष्टीने भारतीय बुध्दी या जागतिक घडामोडींचा स्वबुध्दीने स्वतंत्र परामर्श घेअील आणि आपले स्वतंत्रच दर्शन जगाला देअील अशी आशा मनात पालवते आाहे. त्या कार्याला श्री.दत्त आपटे यांचा ग्रंथ खचित प्रचोदक होअील.

**-महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार**

विल्सनच्या तत्वांवर विसंबून दात पाडून घेण्यात अरब अेकटेच नव्हते, व अेवढेच समाधान पुढे त्यांना मिळाले.

अरबांचे स्वातंत्र्याचे सुखस्वप्न लौकरच विरले. अिजिप्शियन प्रतिनिधींना शांतता परिषदेत हजर राहण्यालाच मुळी बंदी करण्यात आली. अिजिप्तवरील ब्रिटिश संरक्षण काढून घेण्यात तर आले नाहीच, अुलट १९१९मध्ये अमेरिकेनेच त्याला संमती दिली. तुर्की साम्राज्यातील प्रदेशांपैकी अेकट्या हेज्दलाच फक्त शांतता परिषदेला प्रतिनिधी पाठविण्याचा मान मिळाला., पण संयुक्त अरब राष्ट्रावर प्रभुत्व गाजविण्याची महत्वाकांक्षा बाळगणाऱ्या हुसेनीला मात्र ब्रिटिशांनी प्रतिनिधित्वाचा मान दिला नाही. बापाच्या विरुध्द जाअून नुसत्या दमास्कसच्या गादीवर संतुष्ट असलेल्या त्याच्या मुलाला - फीजलला - त्यांनी प्रतिनिधी म्हणून पाचारण केले व लाच घेअून तुर्कांविरुध्द लढणाऱ्या हुसेनीला अेक नवा

धडा शिकविला.

पॅरिसमध्ये शांतता तहाची वाटाघाट करण्यास बसलेल्या मुत्सद्यांना मध्यपूर्वेचा प्रश्न अगदी दुय्यम दर्जाचा वाटत होता. युरोपियन प्रश्नच स्वाभाविकपणे प्रथम घेण्यात आले. होहेनझोलर्न व हॅप्सबर्ग या दोन साम्राज्यांची शकले केल्यानंतर आटोमन अगर तुर्की साम्राज्याची वर्णी लागणार होती. शिवाय अरबस्थानाबद्दल दोस्त मुत्सद्यांचे अज्ञानही अव्वल दर्जाचे असल्याने तो प्रश्न मागे ठेवणे जास्त श्रेयस्कर होते. अरबस्थान हे प्रचंड वालुकामय द्वीपकल्प आहे; त्याच्या काही भागाला आर्थिक दृष्ट्या व लष्करी दृष्ट्या महत्व आहे एवढेच ज्ञान अरब प्रश्नांबाबत त्यांना होते. अिजिप्त त्यांना सुअेज कालव्यामुळे माहीत होता. पॅलेस्टाअीन, अिराक, सीरिया हे हिंदुस्थानच्या खुष्कीच्या मार्गावरील प्रदेश म्हणून माहीत; मोसल आणि पर्शियाचे आखात तेथील खनिज तेलावर डोळा म्हणून माहीत, पण मध्य अरबस्थानचे ज्ञान कोणाला होते? अिबेन सौद व त्याचा वहाबी पंथ, त्याचे मध्य अरबस्थानातील वजन याची त्यांना गंधवार्ताही नव्हती. अरबी प्रश्नांवरील त्यांचा सल्लागार म्हणजे कर्नल टी अी लॉरेन्स, तो फिजलला दुभाष्या म्हणून पॅरीस शांतता परिषदेला आला होता. क्लॅमन्स्क्, लॉअीड जॉर्ज व विल्सन यांची खरी भिस्त काय ती लॉरेन्सवर. अरबी प्रश्नांची माहिती लॉरेन्स देणार व त्या माहितीवर हे मुत्सद्दी आपले धोरण आखणार! मग अरबांना न्याय मिळणार कसा? खुद्द लॉरेन्सला तरी कोठे अिबेन सौदची नीटशी माहिती होती?

अरबी प्रश्नांचे घोंगडे या भानगडीत कित्येक दिवस तसेच भिजत पडले होते. सर्वसाधारण जनमत, अरबांना देण्यात आलेली वचने पाळावीत असेच होते. नोव्हेंबर १९१८ला अिंग्लिश-फ्रेंचांनी अेक संयुक्त घोषणा करून जाहीर केले होते की, 'तुर्की जुलमाखाली खचलेल्या सर्व जमातींना मुक्त करून त्यांना स्वातंत्र्य मिळवून देण्यात येअील.' अेकटा अिराक सांभाळण्यासाठी दरसाल तीन कोट पाअूंड खर्च येतो म्हणून ब्रिटिश युध्दकचेरी विव्हळत असल्याने हे प्रांत ज्यांचे त्यांच्या स्वाधीन करण्यात आर्थिक फायदाच होता; पण साम्राज्यवाद जेथे तेथे नडत होता. अिराक आपण सोडला आणि तो तुर्कांनी घेतला तर? आणि मग सुअेझचे नियंत्रण कुठून करायचे? सीरियामधील फ्रेंच हितसंबंधांची वाट काय? अितके प्रश्न सोडविण्यापेक्षा दिलेल्या वचनांना बगल दिली म्हणून कोठे बिघडले? अिंग्रज-फ्रेंचांनी शेवटी हाच विचार नक्की केला.

१९१९च्या अुन्हाळ्यात अरबांशी तडजोड होअू घातल्याच्या बातम्या बाहेर येअू लागल्या. राष्ट्रसंघाच्या कायद्याच्या १२व्या कलमात नमूद केलेल्या संरक्षणाखालील प्रदेशांची कल्पना अस्तित्वात आली. ही योजना जशीच्या तशीच पुढे दिलेली अधिक बरी-

''ज्या वसाहती व प्रदेश युध्दामुळे पूर्वीच्या सत्तेच्या दडपणाखालून मुक्त झालेले आहेत पण ज्यांना स्वतंत्रपणे राज्य करण्याची व आपले स्वातंत्र्य चालू जमान्यात टिकवण्याची अद्यापि धमक आली नाही अशा प्रदेशांना कोणा तरी राष्ट्राच्या संरक्षणाखाली देअून त्यांची योग्य दिशेने प्रगती करून घेणे भाग आहे. व यासाठी संरक्षणाखालील प्रदेशांची योजना आखण्यात येत आहे.'' अरबांसाठी हे गोड अेरंडेल तयार करण्यात आले होते हे निराळे सांगण्याचे कारणच नाही. यानंतर या प्रांतातील जनतेच्या आकांक्षा तरी काय आहेत हे अजमावण्यासाठी अेक आंतरराष्ट्रीय समिती तिकडे पाठविण्याचे ठरले, पण फ्रान्सने आपला प्रतिनिधी पाठविण्यास नकार दिल्याने ती गोष्ट तशीच राहून गेली व अरबांना आपले गाऱ्हाणे सांगण्यास कोठेच जागा मिळाली नाही. संरक्षित प्रदेशांची व्यवस्था दोस्त राष्ट्रांनी आपापल्या मनाप्रमाणे करण्याचे ठरविले.१९२० मध्ये अिराकचे संरक्षण ब्रिटिशांकडे आले. सीरिया, टारेस पर्वत व सिनाअी वाळवंट यांमधील प्रदेश अिंग्लंड-फ्रान्समध्ये विभागला गेला. दक्षिण भागाचे अर्थात पॅलेस्टाअीनचे, व ट्रॅन्सजॉर्डन या नवीन नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशाचे संरक्षण ब्रिटिशांनी स्वीकारले. राजा फिजलचे दमास्कसचे संस्थान व लेबेनानचा किनारा मिळून बनलेल्या सीरियाचे संरक्षण फ्रेंचांनी पत्करले. यानंतर शेरीफियन घराण्याला देण्यात आलेल्या वचनांची पूर्तता करण्याकडे दोस्तांनी लक्ष पुरविले. साठ वर्षांच्या हुसेनीला त्यांनी हेज्दचा राजा म्हणून मान्यता दिली. हुसेनीनंतर त्याची गादी त्याचा थोरला मुलगा अली हेज्दचा राजा व्हावा असे ठरले. मुस्लीम यात्रेकरूंच्यामुळे होणाऱ्या

अुत्पन्नावर त्यांचा चरितार्थ चालण्याजोगा असल्याने दोस्तांना अितर काही चौकशी करण्याची आवश्यकता भासली नाही. हुसेनीचा दुसरा मुलगा अब्दुल्ला याला अिराकची गादी देण्याचे ठरले; व त्याचा तिसरा मुलगा फिजल याला दमास्कसचा राजा बनविले. ब्रिटिश अगर फ्रेंच संरक्षणाखाली असलेल्या प्रदेशांच्या या राजांना बसल्या जागी अन्नपाणी मिळण्यापलीकडे काय मिळणार याची जगाला व अरबांना काहीच कल्पना नव्हती! महंमदाच्या वंशाचा, त्याच्या मुलखात दोस्तांनी असा सन्मान केला!

तुर्की साम्राज्यातील अनेक जमातींना तुर्कांविरुध्द लढण्यासाठी देअू केलेल्या बक्षिसांची वाटणी ही अशा रितीने सुरू होती. आर्मेनियन लोकांना दोस्तांनी स्वायत्तता देअू केलेली होती; पण शेवटी त्यांना तुर्कांच्या दयाबुध्दीवरच सोपविण्यात आले व तुर्कांनी त्यांची सरसहा कत्तल करून यथास्थित सूड घेतला. अमेरिकेने आर्मेनियाचे संरक्षण पत्करण्यास नकार दिला म्हणून हा प्रकार घडला असा कांगावा करण्यासही दोस्तांनी कमी केले नाही. अिजिप्तवर ब्रिटिशांनी आपले संरक्षण प्रस्थापित केले. अिब्बेन सौद या नेज्दच्या राजाच्या सभोवार त्याच्या शत्रूंचे - शेरीफांचे - अेक कडे तयार करण्यात आले. १९१९-२० च्या दरम्यान दोस्तांनी तुर्की साम्राज्याची अशा तऱ्हेने विल्हेवाट लावली. वस्तुतः या योजनेने कायम स्वरूपात असा कोणताच प्रश्न निकालात निघाला नाही. आपले हे कारस्थान फार दिवस तग धरेल अशी त्यांच्या जनकालाही कधी आशा नव्हती.

## सीरिया :

सीरियन जनतेचा स्पष्ट विरोध असतानाही फ्रान्सने आपले संरक्षण त्यांच्यावर लादले. सीरियाच्या ३० लाख अरबांना निश्चितपणे काय पाहिजे होते हे जरी सांगणे कठीण होते तरी त्यांना फ्रेंचांचे संरक्षित म्हणून राहणे नको होते, अेवढी गोष्ट स्पष्ट होती. मुस्लिम शेतकरी व जमीनदार, डोंगरी ड्रूस, लेव्हेंटाअीन व्यापारी यांमध्ये वंश, अर्थ व धर्मदृष्टचा अनेक भेद असल्याने सीरियाच्या राज्यघटनेबाबत सीरियन जनतेचे अेकमत होण्याचे कोणतेच चिन्ह दिसेना. त्यांची अेकाच गोष्टीत अेकवाक्यता होती, आणि ती म्हणजे फ्रेंच संरक्षणाबद्दल नापसंती. फ्रान्सचे संरक्षण पत्करण्यापेक्षा दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राची गुलामगिरी पत्करली असे तेथील अरबांचे स्पष्ट म्हणणे पडले. आणि त्यामुळे फ्रान्सला शस्त्राच्या जोरावर आपले संरक्षण सीरियावर लादावे लागले. १९२० ऑगस्टमध्ये जनरल गोराड याने लष्कराच्या जोरावर राजा फिजलला दमास्कसमधून हाकून दिले. दोन वर्षे अंमलात असलेली अरबी राजसत्ता नष्ट झाल्याचे जाहीर केले. फ्रेंचांनी नवे लष्करी सरकार दमास्कसमध्ये अुभे केले. फोडा आणि झोडा या साम्राज्यवाद्यांच्या आवडत्या तत्वावर तेथील राज्यकारभार आधारण्याचा फ्रेंचांचा मानस होता. संरक्षणाखालील प्रदेशाचे त्यांनी पाच विभाग केले. लेबनान, लाटाकिया, अलेक्झांड्रेटा, जेबलड्रूसचा डोंगराळ प्रदेश आणि दमास्कसच्या आसपासचा प्रदेश हेच ते पाच भाग होते. या पाचही भागांचा राज्यकारभार स्वतंत्रपणे चाले. फार काय त्यांची निशाणेसुध्दा निरनिराळी होती. फ्रेंच चलन व फ्रेंच सत्ताधिकारी यांखेरीज या पाचही मुलखांमध्ये अेकवाक्यता राहू नये अशी फ्रेंचांनी व्यवस्था करून ठेविली होती. सीरियाच्या या फाळणीने व फ्रेंचांनी तेथील अल्पसंख्याकांना दाखविलेल्या विशेष सहानुभूतीने अरब लोक घाबरून गेले, हवालदिल झाले. या जुलमाचा प्रतिकार करण्याचा निश्चय त्यांनी केला. प्रांताप्रांतांतून अरबाचे दंगे सुरू झाले. फ्रेंचांना तीव्र प्रतिकार होअू लागला. १९३५ साली फ्रेंचांनी ड्रूस पुढाऱ्यांना बाटाघाटी करण्यासाठी दमास्कसला बोलाविले, व विश्वासघात करून त्यांना पकडले. ड्रूसांनी या प्रकारांनी चिडून जाअून सार्वत्रिक अुठावणी केली, व तीत दमास्कसची जनताही सामील झाली. फ्रेंचांनी जगातील सर्वांत जुन्या अशा या शहरावर भडीमार करून त्याच्या ठिकऱ्या अुडविण्याचा प्रसंग आणला. ऑक्टोबर २७ला हा प्रकार प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेला अेक बातमीदार लिहितो, -

''हमिदा आणि स्ट्रेट या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या रस्त्यांमधील शहराचा सर्व भाग अुध्वस्त होअून गेला आहे. दुकानांमागून दुकाने निकालात निघाली आहेत. रणगाड्यांनी व यांत्रिक बंदुकांनी धुमाकूळ घातल्याने जिकडे

तिकडे अेकच नासधूस व कत्तल झाली आहे.''  यानंतर सीरियात फ्रेंच सैन्य पन्नास हजारापर्यंत वाढविण्यात येअून बंडवाल्यांना आश्रय  दिला म्हणून खेडीपाडी जाळून पोळून टाकण्यात आली, व अितका प्रकार झाल्यानंतर अरबांची अुठावणी थंडावली. पण या अुठावणीचा काहीच अुपयोग झाला नाही असे मात्र नाही. ही अुठावणी दडपून टाकण्यासाठी फ्रेंचांनी अवलंबिलेल्या अुपायांमुळे सर्व जगभर फ्रेंचांची नाचक्की झाली व शेवटी फ्रान्सला अव्वल दर्जाचा फ्रेंच मुत्सद्दी हेन्री दि जूव्हेनल याला सीरियात गव्हर्नर म्हणून पाठवावे लागले. या नव्या गव्हर्नरने राष्ट्रसंघाच्या समितीला आपण लवकरच सीरियाशी तह करून तेथील संरक्षण काढून घेणार आहोत असे सांगावे लागले. सीरियन जनतेनेही आता फ्रेंचांशी सहकार्य करण्याचे ठरविले. फ्रेंचांनी सीरियन विधिमंडळाच्या निवडणुकींना मदत करावी व विधिमंडळाने घटना कायदा तयार करावा असे ठरले. या घटना कायद्यानुरूप सीरियन सरकार तयार झाल्यानंतर फ्रान्सने त्याच्याशी आपणांस हवा असलेला तहनामा करून घ्यावा. १९२६ साली मान्सीर जुव्हेनल याने वरील आशयाची घोषणा  केल्यानंतर  पुढे दोन वर्षेपर्यंत फ्रेंचांनी सीरियन विधिमंडळाच्या निवडणुकीची चालढकल चालविली, व विधिमंडळ तयार होताच त्याने तयार केलेला घटना कायदा आपणास अमान्य असल्याचे सांगून ते मोकळे झाले. सीरियन प्रातिनिधिक सभेला आपला तहनामा सादर करण्यास फ्रेंचांनी १९३३ चा नोव्हेंबर महिना आणला. मध्यंतरीच्या काळात या सभेतील बहुमत आपणास अनुकूल राहील अशा सर्व खटपटी ते करून चुकले होते. पण फ्रेंचांच्या तहाच्या अटीच अशा चमत्कारिक ठरल्या की त्या कोणासच मानवणे शक्य नव्हते. सीरियाची फाळणी तशीच चालू ठेवण्याचा आणि आपणास अवश्य वाटेल तेवढे लष्करी सामर्थ्य तेथे ठेवण्याचा आग्रह फ्रेंचांनी धरला होता. लष्करी  छावण्या, विमानतळ यांना आवश्यक असणारी भूमी सीरियन सरकारने फ्रेंचांना या तहान्वये द्यावयाची होती. फ्रेंचांनी हा आपला हट्ट सोडला नाही, व सीरियाला तो पुरविल्यावाचून गत्यंतर नव्हते.

अेकोणिसाव्या शतकापासूनच युरोपमधील ज्यू लोकांचा प्रवाह पॅलेस्टाअीनच्या दिशेने वाहू लागला होता. पण अरबांनी त्यांची फारशी फिकीर अशी कधीच केली नाही. कारण या ज्यू लोकांचे अस्तित्व निव्वळ आपल्या दयाबुध्दीवर अवलंबून आहे, याबद्दल त्यांना खातरजमा होती. मनात येअील तेव्हा आपण त्यांना पळवून लावू ही घमेंडही त्यांना होती. पण पुढे मात्र या प्रकाराला थोडे निराळे वळण लागल्याने अरबांच्याच घरात शिरलेले हे अुंटाचे पिलू त्यांना चांगलेच जाचक झाले. ज्यू लोकांना पुण्यभू, पितृभू पैदा करून देण्याच्या  कामी  ब्रिटिशांनी आरंभापासून थोडे  लक्ष दिले होते. युध्दपूर्वकालात त्यांनी ज्यू लोकांना  युगांडा हा आॅफ्रीकेतील प्रांत पितृभू म्हणून देअू केला होता. पण डॉ.विझमन या ज्यू पुढाऱ्याने ही डासांची वसाहत आपल्याला मानवणार नसल्याचे सांगून या योजनेला नकार दिला होता. ज्यू लोकांना पॅलेस्टाअीनची भूमी पितृभू म्हणून पाहिजे असे त्याचे म्हणणे पडले. या भूमीत राहण्यानेच आपल्या जातभाअींच्या आध्यात्मिक व आधिभौतिक आकांक्षा परिपूर्ण होअू शकतील असेही त्याने सांगितले. पुढे महायुध्द सुरू झाले आणि ब्रिटिशांना विझमनचे साहाय्य अवश्य होअून बसले. जर्मनीने आपले पाणबुड्यांचे प्रभावी शस्त्र  बाहेर काढून ब्रिटिशांची जहाजे धडाडा बुडविण्याचा सपाटा चालविला, व त्यामुळे स्फोटक पदार्थांच्या अुत्पादनास आवश्यक असणारा अल्कोहल ब्रिटिशांना भरपूर प्रमाणात मिळेनासा झाला. याच सुमारास डॉ.विझमनने वनस्पतींपासून अल्कोहल तयार करण्याचा शोध  पूर्णत्वास नेला होता, आणि त्यामुळे त्याचे पाय धरण्यावाचून ब्रिटनला गत्यंतर नव्हते. खुद्द लॉअीड जॉर्ज युध्दोत्तर कालात बोलताना विझमनसंबंधी म्हणाला, ''विझमनच्या कुशाग्र शास्त्रीय बुध्दीने व ज्ञानाने आम्ही वाचलो.'' स्वाभाविकच  लॉअीड जॉर्जने विझमनला दोस्त राष्ट्रांनी आपल्या ऋणांतून अंशतः मुक्त होण्यासाठी काय करावे असा प्रश्न विचारला. आणि विझमननेही सर टॉमस रो च्या अैटीने अुत्तर दिले, 'मला व्यक्तिशः कशाचीच अपेक्षा नाही, पण माझ्या जातभाअींच्याकरिता म्हणून तुम्ही काहीतरी करा.' ज्यू लोकांची अमर्याद संपत्तीही दोस्तांच्या कारणी लागली होती. आणि त्यामुळे नोव्हेंबर'१७ च्या २ तारखेला बेलफोर जाहीरनामा काढून  ब्रिटनने न भूतो न भविष्यति अशी

योजना, - असा अन्याय म्हणा अगर मूर्खपणा, - करून ठेवला. 'परमपूज्य बादशहांचा या जाहीरनाम्याला पाठिंबा असून खुद्द पॅलेस्टाअीनमधील ज्यूंचा, सरकार व अितर जमातींच्या हितसंबंधांना धक्का न लागेल अशी खबरदारी घेण्याचाही मानस आहे'. दोन परस्पर विरोधी गोष्टी अेकदम करून दाखविण्याची आपली हिंमत वरील फर्मानाने ब्रिटिश सरकारने जगाला जाहीर केली, व अरबांच्या आकांक्षांवर घाव घातला. याचा परिणाम व्हायचा तोच झाला. ज्यू व ब्रिटन या दोघांविरुध्द अरबांची मने प्रक्षुब्ध होअून गेली.

यानंतर ब्रिटिशांनी पॅलेस्टाअीनचे संरक्षण पत्करले, व बेलफोर जाहीरनाम्याला जागण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या. हिंदू-मुस्लीम लढ्यावर हिंदुस्थानात आपले आसन स्थिर ठेवणाऱ्या ब्रिटिशांना ज्यू-अरब लढ्यावर पॅलेस्टाअीनमध्ये आपला पाय दृढ ठेवण्यास सोपे जाअू लागले. शस्त्रसंन्यास होअून व्हर्साय तहावर सह्या होअीपर्यंत ब्रिटनने पॅलेस्टाअीनवर निव्वळ लष्करी सत्ताच प्रस्थापित केली होती. १९२० मध्ये सर हर्बर्ट साम्युअल पॅलेस्टाअीनमधील ब्रिटिश 'संरक्षणाची' अंमलबजावणी करण्यासाठी जेरुसलेममध्ये येअून दाखला झाला. आल्यानंतर सर रॉबर्टने शक्यतो निःपक्षपातीपणा दाखविण्याचा प्रयत्न केला, पण तो स्वतः ज्यू असल्याने ज्यू लोकांनी पॅलेस्टाअीनचा पहिला ज्यू गव्हर्नर म्हणून त्याचा अुदोअुदो करून अरबांची माथी भडकवून दिली. अरबांनी 'संरक्षणाला' धाब्यावर बसवून देण्याचे ठरवून भयंकर दंगेधोपे सुरू केले. जाफा, जेरुसलेम येथे तर अगदी कहरच अुडाला! १९२३ च्या सार्वजनिक निवडणुकीवर अरबांनी बहिष्कार घातला. यानंतर लॉर्ड प्लेयूमर यांची कारकिर्द सुरू झाली. १९२५ नंतर आलेल्या आर्थिक मंदीने बरेचसे ज्यू पॅलेस्टाअीन सोडून जाअू लागले, त्यामुळे अरबांना वाटले की ब्रिटिशांचे हे कारस्थान आपोआपच ढासळून पडणार! पण फिरून १९२९ साली परिस्थिती बदलली. या साली प्लेयूमरने राजीनामा दिला व आर्थिक मंदी संपून फिरून ज्यू लोकांची दृष्टी पॅलेस्टाअीनकडे वळली. युरोपमधून त्यांचे नवे जथे पॅलेस्टाअीनमध्ये स्थिर होण्याच्या दृष्टीने येअू लागताच अरबांनी त्यांच्यावर व त्यांच्या संरक्षणकर्त्यांवर फिरून शस्त्र अुपसले. लॉर्ड पॅसफील्ड यांनी याबाबत चौकशी करून आपली 'शुभ्रपत्रिका' त्यावेळचे प्रधानमंत्री मॅक्डोनाल्ड यांना सादर करून सुचवले की, बॅलफोर जाहीरनामा क्षणभर बाजूला सारून पॅलेस्टाअीनकडे धाव घेणाऱ्या ज्यूंवर निर्बंध घातल्याशिवाय अरबांचा लढा थांबणार नाही. या शुभ्रपत्रिकेवर अर्थातच ज्यू लोकांकडून भडीमार करण्यात आला.

अरब आणि ज्यू या दोघांची संस्कृती, वंश सेमेटिक आहेत. दोनही जमाती आपला आद्य पुरुष 'अब्राहम' मानतात, पण दोघांचा धर्म मात्र भिन्न आहे. पॅलेस्टाअीनवर दोघेही राष्ट्रभूमी म्हणून आपलाच हक्क सांगतात. ज्यू आपला अुगम पॅलेस्टाअीनमध्येच असल्याची ग्वाही देतात, तर अरब हजारो वर्षांच्या वहिवाटीचा हक्क सांगतात. अरबांची लोकसंख्या दहा लक्ष तर ज्यूंची चार लक्ष, आणि अशा स्थितीत अेका अमेरिकन ग्रंथकाराच्या म्हणण्याप्रमाणे अिंग्रजांनी अरब सिंह व ज्यू मेंढी यांना अेकत्रित वाढविण्याचा अुद्योग सुरू केला आहे.

वस्तुतः मक्केच्या शेरीफ हुसेनीला दिलेल्या वचनाप्रमाणे सर्वच अरब प्रांत स्वतंत्र व्हावयाचे होते, पण बेलफोर जाहीरनाम्याच्या कोलदांड्याने पॅलेस्टाअीनचे खेकटे निर्माण झाले अगर करण्यात आले व पॅलेस्टाअीनमध्ये कायमची अशांतता प्रस्थापित झाली. प्रथम प्रथम ब्रिटिशांची अशी कल्पना होती की, अरब आणि ज्यू काही कालानंतर पॅलेस्टाअीनमध्ये सुखासमाधानाने नांदू शकतील. निदान आपल्या लष्करी सामर्थ्याच्या जोरावर आपण त्यांना तसे करण्यास भाग पाडू. पण अरबांनी त्यांच्या या कल्पनेला चांगला धक्का दिला. ब्रिटिशांनी आपले स्वातंत्र्य तर नाकारलेच, व हट्टाने ज्यूंना पॅलेस्टाअीनमध्ये स्थायिक करण्याचा चंग बांधला हे पाहून अरबांनी या दोघांनाही विरोध करण्याचा विडा अुचलला. सतत १५-१६ वर्षे अरबांनी पॅलेस्टाअीनमध्ये रक्तपात चालू ठेवला होता. शेवटी कंटाळून ब्रिटिशांनी पॅलेस्टाअीनचे हे प्रमेय सोडविण्यासाठी १९३६ साली अेक समिती स्थापन करून तिच्याकडे पॅलेस्टाअीनचा प्रश्न सोपविला. सर रॉबर्ट पील आणि त्याचे सहकारी यांनी तेथील परिस्थितीचा सूक्ष्म अभ्यास करून आपले निवेदन ७ जुलै १९३७ला प्रसिध्द

केले. अरबांना आणि ज्यूंना वचने देअून ती मोडल्याचा ब्रिटिशांवर होणारा आरोप अमान्य करणे या समितीला अशक्य होते. अेकच घर दोघांना लिहून देणाऱ्या लबाड ठगाची करामत ब्रिटनने केल्याचे उघड दिसत असल्याने या समितीचे कार्य फारच अवघड व गुंतागुंतीचे होअून बसले होते. शेवटी पील साहेबानी पॅलेस्टाअीनच्या पवित्र भूमीची फाळणी करण्याची कल्पना काढली. स्वतंत्र ज्यू संस्थान, अरब संस्थान व ब्रिटिश संरक्षणाखालील प्रदेश असे पॅलेस्टाअीनचे तीन विभाग करण्याचे ठरविण्यात आले. ज्यूंना देअू केलेल्या प्रदेशामध्ये पॅलेस्टाअीनचा बहुतेक सुपीक प्रदेश व हैफा हे अेकमेव अुपयुक्त बंदर यांचा समावेश होत होता. अरबांच्या वाट्याला ज्यूंच्या मानाने बराच मोठा प्रदेश येत होता, पण मुख्यत्वे करून त्यात वाळूचेच पीक होत असल्याने अुंटांना फिरण्याखेरीज अरबांना त्याचा अुपयोग फारसा होण्यासारखा नव्हता. आणि दोहोंच्या मध्ये मालकत्वाचे अधिकार गाजविण्यास सोयीचे पडावे म्हणून ब्रिटिशांनी आपल्या संरक्षणाखालील प्रदेशाचे स्थान ठेवले होते. पण दुर्दैव ब्रिटनचे; अरबांनी व ज्यूंनी या योजनेचा सारखाच धिक्कार केला ! कदाचित ज्यूंचा धिक्कार येथील मुसलमानांच्या रडगाण्यासारखा लाडका असेल अेवढेच! दुसरी गोष्ट म्हणजे ही फाळणी करण्याचा अधिकार ब्रिटनला प्राप्त होत नव्हता ही होय. जिनिव्हाला तळ टाकून बसलेल्या आंतरराष्ट्रीय समितीमार्फत 'संरक्षित' म्हणून समजल्या जाणाऱ्या प्रदेशाबाबतच्या 'विशेष' योजना आखल्या जायच्या असल्याने ब्रिटनचा हा अुपद्व्याप 'अव्यापारेषु व्यापार' ठरत होता. फाळणीची योजना पुढे येअीपर्यंत अरबांचा दात प्रामुख्याने ज्यू लोकांवर होता. हिटलरच्या ज्यूविरोधी धोरणाने पॅलेस्टाअीनमध्ये त्यांची संख्या झपाट्याने वाढत होती. आणि अरबांना हीच गोष्ट विशेष जाचक वाटत होती.

फाळणीच्या योजनेला ब्रिटनकडून वाचा फुटताच अरबांनी ब्रिटिश आणि ज्यू या दोघांनाही सारखाच तडाखा देण्यास आरंभ केला. १९३७ साली पील निवेदनानंतर अरबांच्या झगड्याला फारच तीव्र स्वरूप प्राप्त झाले. ब्रिटिश सैनिक-अधिकारी व ज्यू यांची सरसहा कत्तल अुडू लागली. तत्काळ ब्रिटिश युध्दनौकांनी हैफा व जाफा बंदरांतून अगणित ब्रिटिश सैनिक व युध्दसामग्री अुतरवून अरबांचे आव्हान स्वीकारले. सुमारे वीस हजार ब्रिटिश सैनिकांनी पॅलेस्टाअीनच्या पवित्र भूमीवर अरबांचा समाचार घेण्यासाठी जागरूकपणे लढा चालू केला. जवळजवळ देशभर लष्करी कायदा पुकारण्यात आला आणि अरब अत्याचाऱ्यांना पकडून देण्यासाठी हजारो पौंडांची बक्षिसे जाहीर करण्यात आली. अरबांच्या अराजक चळवळीचा बीमोड करण्याचा चंगच ब्रिटिशांनी बांधला. अरब पुढाऱ्यांना पकडून हद्दपार करण्यात येअू लागले. पॅलेस्टाअीनचा कानाकोपरा धुंडाळून अरब बंडखोरांना हैराण करण्यात आले. त्यांना आश्रय देणारी खेडीपाडी शाही विमानदलाच्या विमानांनी बाँब फेकून अुध्वस्त केली. पळून जाअू पाहणाऱ्या अरब लोकांवर मशीनगन्सनी मारा करण्यात आला. पण अरबांनी आपली चिकाटी सोडली नाही. मिळेल ते शस्त्र हाती घेअून ब्रिटिशांना तोंड देण्याचा त्यांचा अुद्योग सुरूच राहिला. प्राणांची धनाची कशाचीच पर्वा त्यांनी केली नाही. याबद्दल लिहिताना लिटन वेल्स म्हणतो, -

Nowhere under the Union Jack - not even in the turbulent Northwest province of India - are such scenes of disorder being witnessed as there in Palastine.

या सर्व घडामोडींमुळे मुस्लीम जगाचे डोळे काही काळ पॅलेस्टाअीनकडे लागले होते. पील निवेदनाने निर्माण झालेली अशांतता, क्षोभ नाहीसा करण्यासाठी म्हणून प्रत्यक्ष काही निश्चित योजना आखून तिची तत्काळ अंमलबजावणी केल्याखेरीज गत्यंतर नाही म्हणून फिरून वुडहेट कमिटीची योजना करण्यात आली. पण तिचाही काही अुपयोग झाला नाही. १९३८ मध्ये पॅलेस्टाअीनमधील परागंदा अरब पुढारी अिराकमध्ये जमा झाले आणि सर्व ब्रिटिश साम्राज्याला धक्का देणारा ठराव त्यांनी पास केला. पॅलेस्टाअीनमधील ज्यू व ब्रिटिश यांविरुध्द 'जेहाद' अर्थात धर्मयुध्द पुकारण्याचे त्यांनी ठरविले.

''मुस्लीमहो! अैका!! जेहाद हे तुमचे पवित्र कर्तव्य आहे. अल्लाच्या आवडत्या प्रदेशाचे व जगताचे कल्याण साधण्यासाठी या पवित्र कर्तव्याला तुम्ही जागले पाहिजे. मस्जिद अल् अक्सा आणि तिच्या सभोवतालची

पॅलेस्टाअीनची पवित्र भूमी छळली जात आहे; लुबाडली जात आहे! अल्ला तुमच्या बाजूला आहे!!'' धर्मवेड्या मुसलमानांची माथी फिरविण्यास असली फर्माने किती अुपयोगी पडत असतील हे निराळे सांगण्याचे कारण नाही. १९३८ च्या ऑक्टोबरमध्ये आठ मुस्लीम राष्ट्रांचे प्रतिनिधी कैरो येथे जमा झाले होते आणि त्यांनी अेकमताने ब्रिटनकडे अशी निश्चित मागणी केली होती की, ब्रिटनने बाल्फोर जाहीरनामा परत तर घ्यावाच पण अल्पसंख्य ज्यूंना अरबांच्या कचाट्यात सोडून पॅलेस्टाअीनमधून आपला हात काढून घ्यावा; याखेरीज याला दुसरा अुपाय नाही. यानंतर लगेच ता. १८ ऑक्टोबर १९३८ रोजी हाज अमीन अफेंडी अल् हुसेनी या जेरुसलेमच्या ग्रँड मुफ्तीकडून निर्वाणीचा खलिता आला. अरबांचा हा अेकमेव बुध्दिमान धर्मगुरू पॅलेस्टाअीनमधून पळून जाअून सीरियात ठाणे देअून बसला होता. त्याने स्पष्ट शब्दांत मागण्या केल्या होत्या -

१. ज्यूंचा पॅलेस्टाअीनकडे येणारा ओघ तत्काळ थांबला पाहिजे
२. पॅलेस्टाअीनमधील अरबांना संपूर्ण स्वातंत्र्य मिळून त्यांचे राष्ट्रीय सरकार स्थापन झाले पाहिजे.
३. बेलफोर जाहीरनाम्यातील पॅलेस्टाअीन ही ज्यूंची राष्ट्रभूमी करण्याची कल्पना ब्रिटिशांनी सोडून दिली पाहिजे.
४. अरबांच्या पॅलेस्टाअीनमधील राष्ट्रीय सरकारशी ब्रिटनने -फार तर अिराकशी केलेल्या कराराप्रमाणे, सलोख्याचा तह करावा.

ग्रँड मुफ्तीच्या मागण्यांना ब्रिटिशांनी अरब गुप्त संस्थांचा नायनाट व अरब दंगेखोरांची हाडे साफ करून चांगले खरमरीत अुत्तर दिले.पुढेपुढे युरोपात युध्दाचा रंग दिसू लागताच मे १७, १९३९ मध्ये पार्लमेंटने अेका शुभ्र पत्रिकेला मान्यता देअून जाहीर केले, ''पॅलेस्टाअीनमध्ये ज्यूंना राष्ट्रभूमी संपादन करून देण्याचा ब्रिटिशांचा मानस नाही''. तारीख ७फेब्रुवारी १९४० मध्ये सर माल्कम मॅक्डोनल्ड यांनी पॅलेस्टाअीनकडे निघालेल्या ज्यूंना परवानगी देण्याचे नाकारून अरबांना थोडेफार संतुष्ट करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिशांनी आपणास पितृभू म्हणून पॅलेस्टाअीन अर्पण करावा असा ज्यूंचा प्रथमपासून आग्रह आहे. अरबांशी सख्य जोडण्याचे सर्व प्रयत्न आता फसल्याने अरबांना आता विचारात न घेताच, ब्रिटनने आपली सोय आता तेथे लावून द्यावी असाही त्यांचा आग्रह आहे. सुमारे नअू हजार अमेरिकन ज्यू पॅलेस्टाअीनमध्ये स्थायिक झाले असल्याने व त्यांनी सुमारे २० कोटि डॉलर्स अितके भांडवल तेथे गुंतविले असल्याने अमेरिकेलाही आता पॅलेस्टाअीनबद्दल जिव्हाळा वाटू लागला आहे. प्रेसिडेंट रुझवेल्ट अेकदा म्हणाले, '' पॅलेस्टाअीन ज्यूंची राष्ट्रभूमी म्हणून राहावी ही गोष्ट अमेरिकन सरकारला संमत आहे.'' दुसऱ्या अेका खेपेस ते म्हणाले, ''ज्यूंना पॅलेस्टाअीनमध्ये जाण्यास विरोध करणाऱ्या गोष्टी नष्ट करण्यासाठी अमेरिकन सरकार जरूर ती खटपट अवश्य करेल.''

अिंग्लंड अमेरिकेसारख्या पाश्चात्य राष्ट्रांच्या मदतीच्या जोरावर ज्यू लोकांनी पॅलेस्टाअीनवर पध्दतशीर आक्रमण चालू ठेवल्यामुळे पॅलेस्टाअीन अरब प्रांत असूनही अरबांना तेथे पोरके बनण्याची वेळ आली. ज्यूंनी पैशाच्या जोरावर पॅलेस्टाअीनमध्ये जमीन खरेदीचा धुमधडाका अुडविला व अरब शेतकऱ्यांना भिकेला लावले. आता अरबांच्या वाट्याला राहिलेली जमीन अितकी अपुरी आहे की, त्यावर अरबांची अुपजीविका होणेच अशक्य आहे.

जॉन होप सिमसन् आणि लुअी फ्रेंच या अुभयतांनी पॅलेस्टाअीनवरील आपल्या निवेदनातही वरील गोष्ट अुघड केली आहे. पॅलेस्टाअीनमध्ये ज्यूंची संख्या सुमारे ३२ टक्के आहे, पण हैफा व बेरूत यांच्या दरम्यान असलेली सर्व पिकाअू जमीन त्यांच्या ताब्यात आहे. अरबांच्या म्हणण्याप्रमाणे प्रत्येक अरब कुटुंबाला १३०डनाम जमीन चरितार्थासाठी अवश्य आहे. (४.२५ डनाम = १अेकर) होप सिमसन् कमेटीनेही अरबांच्या या मागणीला दुजोराच दिला आहे. परंतु ज्यू लोकांच्या भांडवली आक्रमणामुळे ही गोष्ट अरबांना अशक्य होअून बसली आहे. अरब -ज्यू तेढ भलत्या थराला जाअून बसण्याचे हेही अेक कारण आहेच.

दुसऱ्या जागतिक युध्दानंतर अरब राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न फिरून धसाला लागला व सीरिया - पॅलेस्टाअीनचे दुखणे फिरून अुसळले. मध्यंतरी फ्रान्सचा पाडाव झाल्याने सीरिया मोकळा झाला पण ब्रिटिशांनी

हाती धरलेल्या डी गॉल ने ब्रिटिशांच्या साहाय्याने सीरिया 'स्वतंत्र फेंच सरकारच्या' कह्यात कसाबसा टिकवून धरला होता. युध्दानंतर सीरियाने फिरून अुचल खाल्ली व युध्दातून हाडे खिळखिळी होअून बाहेर पडलेल्या फ्रान्सला सीरियाच्या स्वायत्ततेला रडतकढत का होअीना पण मान्यता देणे भाग पडले.

पॅलेस्टाअीनने अुचल खाल्ली पण पॅलेस्टाअीनचे कोडे मोठेच विचित्र होअून बसले. अमेरिका व अिंग्लंड यांनी युध्दकालात ज्यूंची अेवढी मोठी निर्यात तेथे केली की या ज्यूंना अरबांच्या राजवटीत नांदणे कमीपणाचे वाटू लागले. पॅलेस्टाअीन जसाच्या तसा स्वतंत्र केला तर ज्यूंना अरब राजवटीत नांदणे भाग आहे. ज्यूंना ते मान्य नाही. ज्यूंना स्वतंत्र तुकडा पाडून देणे अरबांना पसंत नाही. नवीन स्थापन झालेल्या 'यूनो' या नवीन सर्वराष्ट्र-संघटनेकडे हा प्रश्न अिंग्लंडने दिला आहे. मध्यंतरी ज्यूंनी ब्रिटिशांविरुध्द काढलेल्या मोहिमेमुळे मजूर सरकारने पॅलेस्टाअीनमधून गाशा गुंडाळण्याचा निर्णय घेतला, व ज्यू आणि अरब या दोन्ही जमातींना त्यांच्या त्यांच्या दैवाच्या हवाली करण्याचे ठरविले. अरबांना स्वाभाविकच या निर्णयामुळे आनंद वाटला. अरब लीग ने पॅलेस्टाअीनच्या रक्षणासाठी स्वतंत्र सैन्य अुभारले. सीरिया या नुकत्याच स्वतंत्र बनलेल्या चिमुकल्या राष्ट्राने आपल्या फौजांची हालचाल अरब लीगला पाठिंबा देण्याच्या दृष्टीने चालू केली. व त्यामुळे 'यूनो'पुढे अेक नवाच पेचप्रसंग येअून पडला. यूनो ने निर्णय घेअीपर्यंत ब्रिटनने हालचाल करू नये असे अमेरिकेचे म्हणणे पडले. पण प्रत्यही ज्यू व अरब अशा दुहेरी अराजकांच्या कारवायांना तोंड देण्याचा प्रसंग येत असल्याने अिंग्लंड थांबण्यास तयार नाही. ग्रँड मुफ्तीने पॅलेस्टाअीनमध्ये घुसण्याचा फतवा काढलाआहे. अिंग्लिश सैन्य हलताच तो पॅलेस्टाअीनमध्ये शिरण्यास तयार आहे.

अिंग्लंड अमेरिकेच्या जोडीला रशियानेही पॅलेस्टाअीनच्या फाळणीला मान्यता दिल्याने अरब जनता स्तिमित झाली आहे. आशियातील राष्ट्रांनी आता विरुध्द मते देअूनही फारसा अुपयोग होण्याची आशा नाही. हिंदुस्थान कदाचित पॅलेस्टाअीनमधील अरबांच्या बाजूला अुभा राहील. पण पाकिस्तान काय करणार? मुसलमान म्हणून अरबांच्या बाजूला जावे तर पाकिस्तानचे पाप आडवे येते. छी थू होअील यूनोत. गप बसावे अगर फाळणीला मान्यता द्यावी तर अरब मुस्लीम भाअींची वाट काय?

अरब लीगमध्ये समाविष्ट होणाऱ्या नव्या ७-८ अरबी राष्ट्रांनी अुघडअुघड पॅलेस्टाअीनच्या फाळणीविरुध्द कमरा कसल्या आहेत. रशियाच्या, फाळणीला मान्यता असल्याच्या निर्णयाने अरबांना धक्का बसला आहे. रशियाने हे धोरण का आखले हे गूढच त्यांना आकलन होअीनासे झाले आहे. पण फाळणीला मान्यता देण्यात रशियाने अमेरिकेचा पाठपुरावा करण्याचे अेकच कारण असावे, पॅलेस्टाअीनच्या निमित्ताने अिराणमधील अमेरिकन राजकारणाचा, रशियाविरोधी सूर कमी करता आला तर पाहावे हाच हेतू यात दिसतो. अिंग्लंड, अमेरिका व रशिया ही तीन राष्ट्रे अितर छोट्या राष्ट्रांच्या मोबदल्यात आपल्या-आपल्यातील तेढ शक्यतो कमी करू पाहात आहेत. पुढचा निर्णायक लढा सुरू होण्यापूर्वी आपापली बैठक बसवून घेण्याचे काम सुरू आहे. या तिघांच्या कारवायांत आशियातील राष्ट्रे बळी पडत आहेत. आशियातील राष्ट्रांमधून दिसून येणाऱ्या फुटीर वृत्तीचा पुरेपूर फायदा आजपर्यंत पाश्चात्य राष्ट्रे घेत आली आहेत; यापुढेही ती घेत राहणारच! या प्रसंगाने खरी कसोटी पाकिस्तानला लागणार आहे.

यूनोचा निर्णय होण्यापूर्वीच सैन्य काढून घेण्याची धमकी ब्रिटनने दिल्यामुळे ज्यूंना जरा वचक बसेल. अमेरिकेने अुपरी मदत कितीही केली तरी ब्रिटिशांचे सैन्य जाताच होणाऱ्या अरब वावटळाला पायबंद घालताना ज्यूंना झळ लागल्याशिवाय थोडीच राहणार आहे? बड्या तीन दादांचा निर्णय अंमलात आला - आणि तो बहुधा येणारच, -तर अरबांना शस्त्र अुचलावे लागणार व पर्यायाने यूनोला अरबांवर दडपण आणावे लागणार. अर्थात मुस्लीम राष्ट्रांना जातभाअींविरुध्द लढावे लागेल, जनाब जीना काय करतील?

हिंदुस्थानने तटस्थता ठेविली तर कोणीच काही बोलू शकणार नाही. तत्वतः फाळणी त्याज्य आहे पण हिंदुस्थानवर ती लादली गेली आहे. अर्थात हिंदुस्थानने या प्रश्नात लक्ष घालण्याचे कारण नाही. मत न देता यूनोचा निर्णय मानावा. जमल्यास, निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा फायदा घेअून हिंदी समुद्रात निर्माण होअून बसलेली धर्मवेडी राजवट मोडून काढण्याचा प्रयत्न करावा.

●●●

## २. अरब तक्रारींना अुत्तर : ले. असिरेल कोहेन

('न्यू फुअेदा' या लंडनमधील ज्यू वर्तमानपत्राने जो लेख छापला. त्याचा अनुवाद पुढे थोडक्यात दिला आहे. त्यावरून पॅलेस्टाअीनमधील ज्यूंचे मागणे कसे अडेलतट्टूपणाचे आहे व त्याला ब्रिटन कसे जबाबदार आहे याची कल्पना येअील.)

अरबांना पॅलेस्टाअीनमध्ये जबाबदार लोकशाही सरकार हवे आहे. आणि त्यांनी आपली ही मागणी अिंग्लंडने युध्दकालात 'अरबांना स्वातंत्र्य देअू' ही घोषणा केली, तीवर आधारलेली आहे. पण १९२२च्या शुभ्रपत्रिकेने 'अरब मुलखांचे स्वातंत्र्य' यात पॅलेस्टाअीनचा समावेश होत नाही असे स्पष्ट म्हटले असल्याने अरबांचा दावा खोटा ठरतो. (हुसेनीच्या पत्रांत पॅलेस्टाअीन असा स्पष्ट शब्द नाही, पण अरब राष्ट्रांच्या मर्यादा सांगतानाच त्याने त्या अितक्या विस्तृत सांगितल्या आहेत की, पॅलेस्टाअीनचा स्वतंत्र अुल्लेख करण्याची आवश्यकताच राहिलेली नाही. ब्रिटन असे काही वांधे काढील म्हणूनच त्याने हडसून खडसून आधी अरब राष्ट्रांच्या मर्यादा वाढवून घेतल्या.) शिवाय पॅलेस्टाअीनमधील अरबांनी तुर्कीविरुध्द बंड केलेले नाही. (गेल्या स्वातंत्र्ययुध्दात ज्या तालुक्याने भाग घेतला नाही त्यांना स्वातंत्र्य देअू नका असे म्हणण्यापैकीच हा प्रकार. सर्व अरब मुलखाशी तुलना करता पॅलेस्टाअीन हा अेक तालुकाच ठरेल.)

डॉ.विझमन व फिजल यांचा १९१९ मध्ये पॅरिसमध्ये जो करार झाला, त्या अन्वये अरब राष्ट्रामधून पॅलेस्टाअीनला निश्चित वगळण्यात आले आहे. (वस्तुतः हुसेनीशी मॅकमोहनचा पत्रव्यवहार झाला असता पॅरिस शांतता परिषदेला त्याला न बोलावता फीजलला का बोलावले याचा येथे अुलगडा होतो. विझमन हा वस्तुतः संशोधक, पण त्याला पुढे करून व फीजलला गोत्यात आणून ब्रिटिशांनी हा बनाव घडवून आणला. कर्नल टी.अी. लॉरेन्स हाही तेथे वावरत होताच.) व त्याचे कारण देताना फीजलने म्हटले आहे, 'On account of its (Palestine) Universal Character.

अरब शेतीला मुकत आहेत अशी अरबांची दुसरी खोटी तक्रार आहे, पण तीही चूक आहे. ज्यूंची संख्या ३० टक्के आहे व त्यांच्या वाट्याला ३.१० लाख हेक्टर जमीन आहे. म्हणजे पॅलेस्टाअीनमधील ६० लाख अेकर जमिनीपैकी फक्त ५टक्के जमीन ज्यूंच्या ताब्यात आहे! (हातचलाखीचे अर्थशास्त्र ते हे. अरबांच्या वाट्याला घातलेल्या जमिनीत पिकाअू जमीन किती? पिकाअू अस्सल जमिनीपैकी किती टक्के जमीन ज्यूंनी हाताळली आहे, हे नेमके लेखकाने वगळले आहे.)

होप सिमसन् कमिटीचे निवेदन चुकीचे आहे, आणि अशा चुकीच्या निवेदनावर अरब आपली अिमारत अुभी करीत आहेत. अरबांना कुटुंबी ७५अेकर जमीन पुरेशी आहे. (कमिटी १३० अेकर सांगते.)

मध्य आशियातील फार मोठा प्रदेश अरबांनी व्यापलेला आहे. त्यांना कोठल्याही प्रदेशात जाअून तेथील समाजाशी अेकरूप होता येअील, पण गेली ९०० वर्षे आम्ही अधांतरी आहोत. पॅलेस्टाअीनखेरीज कोठेही आमचे स्वतंत्र राष्ट्र अस्तित्वात येणे शक्य नाही, अरबी भाषा बोलणाऱ्या प्रदेशाचा अेक वीसांश अेवढाच हा प्रदेश आहे. ज्यूअिस्तानमध्ये आम्ही अेकत्र पण शांततेने राहू शकू मग अेवढ्या तुकड्यासाठी अरबांनी तरी अेवढे अकांड तांडव का करावे?

शेवटच्या अेकाच वाक्यात लेखकाने आपली खरी बाजू मांडली आहे. पण ज्यूंनी अरबांना अधिक पटविणे भाग आहे. तिऱ्हाअितांच्या कच्छपी लागून दोघांचेही नुकसान.

सदर पुस्तकाची छपाअी चालू असताच यूनो चा पॅलेस्टाअीनच्या फाळणीचा निर्णय जाहीर झाला. फाळणीला हिंदुस्थानने विरोध केला ही गोष्ट तात्विक दृष्ट्या बरोबरच झाली. पण पाकिस्तानचा विरोध हे अेक धाडसच म्हणावे लागेल. जी गोष्ट हिंदुस्थानमध्ये मुसलमानांना न्याय्य वाटते तीच पॅलेस्टाअीनमध्ये मात्र अन्यायाची वाटते. असल्या कंगाल राजकीय धोरणाला या दिवसांत कोण भीक घालणार? अरब राष्ट्रांनी व अरब राष्ट्रसंघाने काहीही अवसान आणले तरी संयुक्त राष्ट्रांनी घेतलेला फाळणीचा निर्णय शस्त्रबळावर बदलणे त्यांना अशक्य आहे. सर्व आशियाकडे यासाठी अरबांना याचना

करायची असेल तर कायूमखान जीना यांसारख्या आपल्या जात्यंध बांधवांना त्यांना धडा द्यावा लागेल. आणि ही तयारी असेल तर आशियातील राष्ट्रांची सहानुभूती मिळणे शक्य आहे. हिंदुस्थानने आपली तात्विक भूमिका या प्रकरणी स्पष्ट केलीच असल्याने त्याने यापुढे या प्रश्नात अधिक लक्ष घालण्याचे मुळीच कारण नाही. ब्रिटनने स्वीकारलेली तटस्थता व अमेरिका आणि रशिया यांनी फाळणीबाबत खाल्लेली अुचल लक्षात घेण्याजोगी आहे. ज्यू-अरब लढा यापुढे रशिया व अमेरिका यांचा खेळ होणार आहे, अिंग्लंडने आजपर्यंत तोच खेळ केला आहे. आशियातील राष्ट्रे अद्यापि सावध होअू नयेत हे विशेष आहे. अरब-ज्यू व हिंदुस्थान-पाकिस्तान या लढाया आपल्या सार्थकी लावण्यासाठी खटपट करणे अेवढा अेकच स्तुत्य अुपक्रम यापुढे रशिया व अमेरिका यांच्यापुढे राहील.

सन १९३१ च्या शिरगणतीप्रमाणे पॅलेस्टाअीनमधील ज्यू व अरब यांची लोकसंख्या पुढीलप्रमाणे आहे -

| | | | |
|---|---|---|---|
| मुसलमान | ७५९९५२ | : | ७३% |
| ज्यू | १७५००६ | : | १७% |
| ख्रिश्चन | ९०६०७ | : | ८% |

पैकी ख्रिश्चन हे अरब बाटून झाले असल्याने त्यांना अरबांत जमा करण्यास हरकत नाही. आज ज्यू ३२ टक्के आहेत याचा अर्थ ज्यू तेथे नेअून भरण्यात आले आहेत हाच होतो.

## ज्यू-अरब समस्या

ज्यू सर्व जगभर पसरलेले आहेत, परंतु पश्चिम युरोप व अमेरिका यांमधील ज्यू, तेथील भाषा चालीराती व जनता यांच्याशी अेकरूप होअून गेलेले आहेत; फक्त धार्मिक बाबींपुरते मात्र आपले स्वतंत्र अस्तित्व ते टिकवून आहेत. पूर्व युरोपात 'अिडिश' भाषा बोलणारे ज्यू अत्यंत अल्प प्रमाणात असल्याने त्यांचा स्वतंत्र राजकीय प्रश्न तेथे तयार होअू शकत नाही.

काही वर्षांपूर्वीपासून (सुमारे १९१४पासून) देशादेशांतून विखुरलेल्या ज्यूंना पॅलेस्टाअिनकडे वळण्याची सार्वत्रिक बुध्दी होअू लागली. पॅलेस्टाअीन ही आपली पितृभू म्हणून राहावी ही भावना त्यांच्यामध्ये प्रबळ होण्यास विशेषतः अिंग्लंड कारणीभूत झाले. 'झुवानिस्ट' चळवळीने हिब्रू भाषेच्या पुनरुत्थानाचे कार्यही हाती घेतले. गेल्या महायुध्दानंतर (१९१४) पॅलेस्टाअीन ब्रिटिश संरक्षणाखाली आला व तेथे ज्यूंना विशेष सवलती मिळू लागल्या. हिब्रू भाषेला सरकार दरबारी मान्यता मिळाली व ज्यूंचा ओघ पॅलेस्टाअीनकडे बुध्दिपुरस्सर वाहू देण्यात आला. ज्यूंना त्या कामी अुत्तेजनही देण्यात आले. याच्या जोडीला १९३४साली रशियाने अतिपूर्वेला ज्यूंचा अेक स्वायत्त प्रदेश निर्माण केला व तेथे 'अिडिश' ही सरकारमान्य भाषा ठरविली. परंतु येथे काय किंवा पॅलेस्टाअीनमध्ये काय,ज्यू 'बहुसंख्य जनता' या सदरात पडू शकले नाहीत. दोनही ठिकाणी अितके करूनही ते अल्पसंख्यच राहिले.

शेकडा १०पेक्षा अधिक ज्यूंची संख्या असलेले प्रदेश म्हणजे पोलंड, अरब 'येमन' संस्थान, टँजीर आणि अमेरिकेतील न्यू यॉर्क संस्थान हे होत. याखेरीज मोरोक्को, अल्जेरिया, ट्यूनिस, ल्यूथिनिया, अिस्टोनिया (पूर्वीची बाल्टिक संस्थाने) व रशिया येथे ज्यू आहेत, पण त्यांना स्वतंत्र असे राजकीय अस्तित्व नाही. जगातील ज्यूंची संख्या सुमारे १.६० कोटि असावी. त्यापैकी ४५ लाख अमेरिकेत, ३० लाख पोलंडमध्ये, ३० लाख रशियामध्ये, १० लाख रुमानियात, ५ लाख फ्रान्स व फ्रेंच साम्राज्य यामध्ये, ५ लाख जर्मनीत, ४ लाख झेकोस्लाव्हाकियात, ९ लाख ब्रिटिश साम्राज्यात असे ते पसरले आहेत. याखेरीज अल्प प्रमाणात ते ठिकठिकाणी आहेत ते निराळेच. ज्यूंचा खरा भार रशिया व अमेरिका यांवर असल्याने त्यांनी पॅलेस्टाअीनमध्ये त्यांची वर्णी लावण्याचा चंग बांधावा यात काहीच आश्चर्य नाही.

## अरब

सौदी अरेबिया, येमन, अिराक, अिजिप्त ही प्रमुख अरब राष्ट्रे असून सीरिया, ट्रान्स जॉर्डन, मोरोक्को, ट्यूनिस या ठिकाणी स्वतंत्र अरब जमाती मोठ्या प्रमाणात राहतात. अिराणच्या आखातामधील बेटांतूनही त्यांची वस्ती आहे; पॅलेस्टाअीनमध्ये ते निर्विवाद बहुसंख्याक आहेत. वस्तुतः ऑफ्रिकेच्या अुत्तर किनाऱ्यावरील टँजीरपासून तो तहत अिराण तुर्कस्तानपर्यंत सर्व जनता अरबच आहे व या

मुलखाची भाषाही अरबी अगर तत्सम आहे. हे अरब पूर्वीपासून व्यापारधंद्याबद्दल प्रसिध्द आहेत. त्यांची संख्या सुमारे ६कोटि असून ती या विस्तृत प्रदेशावर विखुरली आहे. स्वतंत्र अरब संस्थानात त्यांची संख्या सुमारे ३ कोटि असून बाकीचे ब्रिटिश व फ्रेंच नियंत्रणाखालील प्रदेशात वावरत होते. ही नियंत्रणे आता नष्ट झाली असल्याने हे प्रदेशही अरबांची स्वतंत्र संस्थाने म्हणून राहू शकतील अगर मूळ अरब संस्थानात समाविष्ट होतील, पण पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंचे स्वतंत्र संस्थान अुभारण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याने अरबांच्या या समुद्रात ज्यूंचे अेक बेट निर्माण होणार आहे व ते शस्त्रबळावर टिकवले जाणार आहे.

●●●

## ३. सौदी अरबस्तान

मक्केच्या पवित्र क्षेत्रात महंमदाच्या वंशातील अिसमाला गादीवर बसवून मुसलमानांची मर्जी संपादन करू, अशी ब्रिटिशांची कल्पना होती. पण प्रत्यक्ष परिणाम मात्र त्यांच्या अपेक्षेच्या अगदी विरुध्द झाला. ब्रिटिशांच्या या हस्तकाने आपल्या लीलांचा अगदी कहर करून सोडला. हुसेनीने सर्व सत्ता आपल्या हाती घेअून पाश्चात्य राजकीय सुधारणांचा मागमूसही अरबस्थानात राहू दिला नाही. हेजची सर्व सूत्रे त्याने आपल्या अेकट्याच्या हाती ठेवली. त्याने स्वतः नेमलेल्या अधिकाऱ्यांवरही त्याचा अगदी विश्वास नसे. प्रत्येक मनुष्य लुच्चा असलाच पाहिजे हा त्याचा आवडता सिध्दांत! त्यांना पगारही अगदी अल्प असत. स्वतःची तुंबडी कशी भरेल अिकडे त्याचे लक्ष असे. राज्यातील पोस्ट, तार, रेडिओ, वाहतूक वगैरे सर्व खात्यांवर त्याने आपली खाजगी मालकी ठेवली असल्याने राष्ट्राच्या भरभराटीच्या दृष्टीने त्यांचा काहीच अुपयोग होत नसे. जुनी मोडकी विमाने त्याने कधीकाळी घेअून ठेवली होती, व ती तशीच पडून होती. त्यांची दुरुस्ती करण्यासही तो तयार नव्हता. कारण दुरुस्तीचे निमित्त करून मधले लोक पैसे खातील अशी भीती त्याला वाटत होती. सैन्याला तर कधी पगार मिळतच नसे, पण खाणे तरी भरपूर मिळत असे किंवा नाही याची शंकाच होती! मोठमोठ्या अधिकाऱ्यांनाही तो आपले खाजगी नोकर मानण्यास कमी करत नसे. परराष्ट्रीय वकिलांशीही त्याची वागणूक अुद्दामपणाची असे. हेजचा राज्यकारभार म्हणजे १९२४च्या सुमारास अेक विनोदी प्रहसन होअून बसले होते. हुसेनच्या या जुलमी विचित्र कारभारामुळे लोक त्रस्त होअून गेले होते. पूर्वीचे तुर्की राज्य बरे पण हे नको, असे म्हणण्याची पाळी त्यांना आली होती; पण करणार काय? हुसेनी ब्रिटिशांचा हस्तक होता. त्यांच्या वशिल्याने तो गादीवर आला होता.

१९२४ साली हुसेनीने अरब प्रांतावरील ब्रिटिश संरक्षण आपणास अमान्य असल्याचे जाहीर केले, व त्याचबरोबर सर्व अरबी मुलखाचे राजेपण आपणाकडे घेतले. १९१६ ते १९च्या दरम्यान अिंग्लंडने त्याला चारलेले ६० लाख पौंड पचविताना त्याने जाहीर केले, ‘हे पैसे युध्दकालात ब्रिटनला मदत केल्याबद्दल आहेत, यापुढे अिंग्लंडची मनधरणी करण्यासाठी नाहीत; त्यासाठी फारतर त्यांनी निराळी किंमत मोजावी.’ ७० वर्षांच्या म्हाताऱ्याचा हा हिरवटपणा ब्रिटनपेक्षाही जर अधिक कोणाला दुःसह झाला असेल तर तो मध्य अरबस्तानचे पुढारीपण आपणाकडे घेअून बसलेल्या अिबेन सौदला. अरब मुलखावर हुसेनीने सांगितलेला सार्वभौमत्वाचा हक्क त्याला मुळीच मान्य झाला नाही. १८व्या शतकापासून नेजच्या ओॲसिसमध्ये अरबांच्या अेका जमातीने अिस्लाम धर्माचे शुध्द स्वरूपाचे अुत्थापन करण्यासाठी प्रयत्न चालविले होते. या पंथाला त्याच्या पुढाऱ्याच्या नावावरून वहाबी असे नाव पडले होते. हुसेनीचे कालिफपद व त्याने केलेली अिस्लाम कायद्यातील ढवळाढवळ या दोनही गोष्टी त्याला अमान्य

होत्या.

कुराणाचा कायदा अक्षरशः मानणारा हा पंथ हजामत त्याज्य मानी. तंबाखू ओढणे, जुवा खेळणे, मद्यप्राशन करणे, रेशमी कापड वापरणे, सोन्या चांदीचे अलंकार घालणे या गोष्टी या पंथाने त्याज्य मानल्या असतील तर त्यात काहीच आश्चर्य नाही. जादूटोण्याचा पुरस्कारही त्याने कधी केला नाही. मध्य अरबस्तान ओलांडून हेजमधील पवित्र स्थानांचा कबजा या वहाबी लोकांनी अेका काळी घेतलाच होता, पण हा फार जुन्या काळचा अितिहास होता. १८८५मध्ये वहाबी पंथाचा शेवटला राजा नेज्जमधून हाकून देण्यात आला व तेव्हापासून त्याचा मुलगा दुसरा अबुल हजीज अिब्बेन सौद हा निष्कांचन बनून अिराणच्या आखाताच्या नजिकच्या प्रदेशात भटकत होता. त्याच्या बापाला पिटाळून लावले त्यावेळी अिबेन फक्त ५ वर्षांचा होता; पण वयाच्या २०व्या वर्षी अिब्बेन साडेसहा फूट अुंचीचा अुमदा अरब जवान बनला. सर्व अरबांत आपल्या अुंचीमुळे तो अुठून दिसे. २२व्या वर्षी त्याने अरबांचा अेक छोटासा जथा गोळा करून रात्रीच्या वेळी 'रीदाज' या नेजच्या राजधानीच्या शहराची तटबंदी चढून, तेथील शिबंदीला अकस्मात गाठून नामोहरम केले. अिबेनच्या चढाअीला प्रथम सुरुवात येथून झाली व पुढील १० वर्षांत तुर्कस्तानला त्याने चांगलेच सतावले. हेजचा राजा हुसेन याला तुर्कस्तानने अिबेनवर चाल करून त्याचा नायनाट करण्यास सांगितले. कारण हुसेन त्यावेळी तुर्कांचा मांडलीक होता. हुसेनने अिबेन सौदच्या भावाला पकडले व त्याच्या जिवावर अिबेनला तुर्कांचे स्वामित्व मानण्यास भाग पाडले. त्याच्याकडून १हजार पौंड दंडही वसूल केला. ही गोष्ट १९१२ साली घडली; व तेव्हापासून हुसेनीचे शेरीफ घराणे व अिब्बेनचा वहाबी पंथ यांची चांगलीच लढत जुंपली!

याच साली अिबेनने अेक स्वतंत्र संस्था स्थापन केली; अरबस्थानच्या अितिहासात त्याचे नाव अजरामर होण्यास ही संस्थाच कारणीभूत झाली. त्याचे सर्व अनुयायी हे ओअॅसिस हुडकीत हिंडणारे भटके अरब होते. दुष्काळात अगर अडचणीच्या दिवसांत प्राण वाचविण्यासाठी त्यांच्यापाशी अेकच साधन होते, आणि ते म्हणजे लुटारूपणा! आपल्याच जमातीवर अगर शेजारच्या मुलखावर किंवा प्रवाशांवर धाड टाकून चरितार्थ चालविणे हाच अेक त्यांचा खरा धंदा होता. मक्केला जाणारे यात्रेकरूही त्यांच्या या धाडीतून सुटत नसत. वहाबी तत्वज्ञानाची ओळख करून देअून आपल्या या अनुयायांची लुटारू वृत्ती कह्यात आणणे हे कार्य प्रथम अिबेनला हाती घ्यावे लागले; आणि ते यशस्वी करण्यासाठी म्हणून त्याने आपली 'अिखवान' ही लष्करी संघटना चालू केली. अिखवान याचाच अर्थ बंधुजन असा आहे. या संघटनेतील वीरांना अिबेनचे पुढारीपण मानावे लागे. शक्यतो सुपीक प्रदेश पाहून अिबेनने या लोकांना तेथे स्थायिक बनविण्याचा प्रयत्न केला. अिखवानांच्या या वसाहती म्हणजे अिबेनची ही लष्करी ठाणीच होअून बसली. अिखवानच्या या वसाहतींमधून शेती चाले, वहाबी पंथाच्या तत्वज्ञानाचा प्रचार चाले. १९१२ साली पहिली वसाहत स्थापन झाली, आता त्यांची संख्या सुमारे १५०आहे.

१९१३ला अिबेनने तुर्कांवरील आपला फार दिवसांचा राग काढला. 'हासा' काबीज करून त्याने वहाबी पंथाचे वर्चस्व अिराणच्या आखातापर्यंत दामटले. महायुध्द कालात दोस्तांकडून त्याला दरमहा ५हजार पौंड निव्वळ तटस्थ राहण्यासाठी म्हणून मिळत. अिबेनचा शत्रू हुसेनी याला मिळणारा तनखा याहूनही कितीतरी मोठा होता, पण अिबेन गरजू असल्याने त्याने फारसे ओढून धरले नाही. शिवाय हुसेनीला - शेरीफाला - मिळणारा तनखा पुढेमागे वहाबीला घातक होणार नाही, अशी हमी त्याने ब्रिटिशांकडून घेतली होतीच. पण हुसेनीने १९१८साली ही हमी धाब्यावर बसविली व खुर्माच्या 'ओअॅसिस'वर सरळ तीनदा हल्ले चढविले. खुर्मा ही वहाबी वसाहत असल्याने अिबेनला अुलट तडाखा देणे प्राप्तच होते. अिबेनने अेका रात्री अकस्मात हल्ला चढवून खुर्माची वसाहत तर परत जिंकलीच, पण हुसेनीचा मुलगा अबदुल्ला यालाही पकडले.

१९२१मध्ये मुलुखगिरी करीत करीत तो अिराकच्या सीमेपर्यंत आला. ब्रिटिशांनी या वहाबींशी तह करण्याचे ठरविले. कुवेत येथे अेक परिषद भरविण्यात आली, पण

तीमधून काही फारसे निर्माण झाले नाही. शेरीफियन घराण्यातील लोकांनी ट्रॅन्स जॉर्डन, अिराक, हेज अित्यादी ठिकाणी राज्य करावे ही गोष्ट सौदला मान्य नव्हती. तर सौदच्या लोकांनी अिराकच्या सरहद्दीवर लुटालूट करावी ही गोष्ट ब्रिटिशांना मान्य नव्हती. अिब्बेनने या प्रकाराला आळा घातला नाही तर ब्रिटनला जवळजवळ त्याच्याविरुध्द युध्दातच पडावे लागेल असा अिशारा जनरल बेल याने दिला. १९२२पासून ब्रिटनबरोबर अिब्बेनची लढाअी जवळजवळ जुंपलीच म्हणायची.

१९२४ साली केमालपाशाने खलीफाची गादी रद्द करताच हुसेनीचा अविचारी मुलगा अब्दुल्ला याने आपल्या बापाला खलीफा पद आपणाकडे घेण्याचा सल्ला दिला. याच वेळी ब्रिटनने अिब्बेन सौद व हुसेन यांना देण्यात येणारी लाचही बंद केली, आणि त्यामुळे शेरीफावर हल्ला करण्यात अिब्बेनला दुहेरी कारण सापडले. त्याने तीन बाजूंनी चढाअी करण्याचे ठरविले. ट्रॅन्स जॉर्डन व अिराकमध्ये त्याची डाळ शिजली नाही. त्याच्या अुंटांच्या काफिल्यावर ब्रिटिश हवाअी दलाने बॉंब वर्षाव करून त्याच्या ठिकऱ्या अुडविल्या, पण हेजला मात्र ब्रिटिश हवाअी दलाचे संरक्षण नव्हते. कारण त्या भागात ब्रिटिशांचे हितसंबंध मुळीच नव्हते. सौदने अल्ली ला तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यावरील जेफा पर्यंत मागे रेटले. म्हातारा शेरीफ मक्केतच ठाणे देअून बसला होता. ते शहर सोडण्यास तो तयार नव्हता. पण त्याच्या अनुयायांनी त्याला मोठ्या जुलमाने बाहेर काढले. अिब्बेन सौद मक्केत आला, पण त्या पवित्र शहरात प्रवेश करताना अेखाद्या जेत्याचा अभिनिवेश त्याने आणला नाही.अेखाद्या यात्रेकरूच्या थाटाने पायी चालत त्याने शहरात प्रवेश केला. अुन्हाळ्यात मक्केला आलेल्या यात्रेकरूंना शहरात शांततेचे साम्राज्य तेव्हापासून दिसू लागले. मुस्लीम जमातींपैकी अत्यंत सनातनी व शुध्दाचरणी जमातीच्या हाती आता मक्केचा कारभार आला होता.

अिब्बेन सौद हा आता हेज आणि नेज येथील दोन्ही जमातींचा अधिपती झाला होता. या दोन विभागांचे अेकत्रीकरण करणे हे काही सामान्य काम नव्हते. हेजच्या स्वैर वर्तनी नागरिकांचा द्वेष मध्य आशियातील सनातनी कट्टर जमातींच्या हाडीमासी खिळलेला होता. मक्केत राहून तंबाखू ओढणाऱ्या, मद्यप्राशन करणाऱ्या यात्रेकरूंना व नागरिकांना लुटण्यापलीकडे, त्यांची कत्तल करण्यापलीकडे दुसरा कोणताच कार्यक्रम या जमातींना मानवण्याजोगा नव्हता. अिब्बेन सौदला आपल्या या जातभाअींना आवरता आवरता पुरेवाट झाली. जेद्दा ते मक्का रेल्वे रस्ता त्याने तयार केला. यात्रेकरूंसाठी सुखसोयी निर्माण केल्या. मक्केला जाण्यासाठी मोटारमार्ग चालू केला; आणि हे करीत असताना आपल्याच अनुयायांकडून या कार्याची नासधूस होअू नये म्हणून त्यांना सारखे कैचीत ठेवले. लाखो यात्रेकरूंना मक्केतील नव्या सुखसोयी पाहून आनंद वाटला. यात्रेकरूंची संख्याही वाढली, पण अिखवान नावाने ओळखल्या जाणाऱ्या अिब्बेनच्या लष्करी अनुयायांना ही गोष्ट आवडली नाही. त्यांना राग आला! त्यांना वाटले, अिब्बेन वहाबी पंथाच्या तत्वप्रणालीविरुध्द वागू लागला, सुधारू लागला. मोटारीतून फिरणे, नभोवाणी केंद्रांची स्थापना करणे या गोष्टी म्हणजे तो जादूटोण्याच्या नादाला लागल्याचे स्पष्ट पुरावेच नव्हेत काय? पवित्र कुराणाचा त्याने अुपमर्द आरंभिला आहे असे त्यांच्या मनाने ठाम घेतले. अिब्बेनने त्यांची समजूत काढण्याचे ठरविले. तो म्हणाला,'' आज मुस्लीम झोपेतून जागा होत आहे. हाताशी असणारी दोन्ही प्रकारची शस्त्रे त्याने आता वापरली पाहिजेत. पावित्र्य आणि परमेश्वरी आज्ञा हे पहिल शस्त्र; आणि मोटारी व विमानांसारखे शास्त्रीय शोध हे दुसरे शस्त्र. या दोनही शस्त्रांचा मुस्लीमांनी आता अुपयोग केला पाहिजे.'' त्याचा हा युक्तिवाद सर्व मुस्लीम जगाला पटला असल्यास आश्चर्य नाही, पण अिखवान अद्यापि शंकितच होते! सौदने अिंग्लिशांसारख्या निरीश्वरवाद्यांशी केलेला तह त्यांना मान्य झाला नाही. त्यांनी अिराकच्या सरहद्दीवर हल्ले चढवून आपला असंतोष प्रगट केला. अिंग्लिशांनी परस्पर अिराकी लोकांना भरीला घालून त्यांना लागेल ती मदत देअून अिखवान योध्यांना परत नेजमध्ये ढकलले. तेथे अिब्बेनने आपल्या या अनुयायांच्या माथेफिरू निवडक पुढाऱ्यांना ठार मारून, फिरून ही चुकलेली मेंढरे आपल्या कळपात ओढून घेतली.

तांबड्या समुद्रापासून अिराणच्या आखातापर्यंत व

हिंदी समुद्रापासून सीरियन वाळवंटापर्यंत पसरलेल्या अरबी मुलखावर अिबेन सौदने आपला अेकछत्री अंमल प्रस्थापित केला व हेज आणि नेज या दोन विभागांचे शेवटी अेकीकरण करून टाकले. १९२४ मध्ये ट्रान्स जॉर्डन आणि अिराक यांमधून अेक पाचर मारून त्याने आपल्या भोवतालचे कडे फोडून काढले. पण ब्रिटिशांनी त्याला तेथून हुसकून, फिरून ते सांधून घेतले. ब्रिटिशांविरुध्द आपले काही चालू शकत नाही अेवढे तो ओळखून चुकला! यानंतर ब्रिटिशांनी पॅलेस्टाअीन ते अिराणचे आखात हा खुष्कीचा मार्ग तयार करण्याचे काम सुरू केले. तेथून त्यांचे तेलाचे नळही टाकण्यात येअू लागले. त्यामळे सौदने आपला राग व पूर्वीचे शत्रुत्व गिळून ट्रान्स जॉर्डनचा अबदुल्ला व अिराकचा फीजल आणि त्याचा मुलगा यांच्याशी नाअिलाजाने मैत्रीचे तहनामे करून टाकले. त्याला मुलूखगिरी करण्यास दक्षिणेशिवाय कोठे जागाच राहिली नाही. येमनचे छोटेसे स्वतंत्र संस्थान दक्षिणेला अद्यापि टिकाव धरून होते. १९३४ साली अिब्बेनने ते गुंडाळले.

''प्रत्येक युगाच्या आरंभी परमेश्वर आपल्या लेकरांच्या अुध्दारासाठी आपला प्रेषित पाठवेल!'' हा महंमदाचा आशीर्वाद होता. 'हेच ते प्रेषित वाटते-?' म्हणून वहाबी अिब्बेनची कुचेष्टा करीत. आधुनिक सुधारणेच्या जादुगारीत रमणारा, संतानाबरोबर बसून खाना घेणारा, पेढ्यांच्या रूपाने सावकारी करणारा, अिंग्लिश व अमेरिकन तेल कंपन्यांना आपल्या मुलखात वाव देणारा हा अिब्बेन सौद पूर्वीचाच की काय, अशी त्यांना शंका वाटे. जागतिक आर्थिक मंदीमुळे अिजिप्त हिंदुस्थान व अितर पूर्वेकडील प्रदेश यांमधून मक्केला येणाऱ्या यात्रेकरूंची संख्या १९२९ पासून बरीच घटली व त्यामुळे सौदच्या अुत्पन्नात पुष्कळ घट आली. ही घट भरून काढण्यासाठी पाश्चात्य व्यापारी मंडळ्यांना आपल्या मुलखांत वाव देण्याखेरीज दुसरा सोपा अुपाय त्याला दिसला नाही. आज अिब्बेनचा मुलुख सौदी अरबस्तान म्हणून ओळखला जातो. त्याचे स्वातंत्र्य निर्भेळ आहे. कोणाही परकीय राष्ट्राचे दडपण त्यावर नाही. अरबांचे स्वातंत्र्य अेवढ्या भागापुरते काय ते निर्भेळ आहे.

दुसरे महायुध्द आले आणि गेले. अिब्बेन सौदच्या अरबस्थानावर व त्याच्या राजवटीवर त्याचा काहीअेक परिणाम झाला नाही. अिब्बेन खूप म्हातारा झाला आहे. पण तरुणाच्या अुमेदीने तो अरब प्रांतात चालू असलेले राजकारण हाताळत आहे. मुसलमानांचा मध्ययुगीनपणा नष्ट का होत नाही हे अेकच कोडे त्याला डाचत आहे.

●●●

## ४ .अिराक : स्वातंत्र्यासाठी धडपड

अिराक हे गेल्या महायुध्दाने अस्तित्वात आलेल्या कित्येक नावांपैकी अेक नाव आहे. युध्दपूर्वकालात हा प्रदेश मेसापोटेमिया या नावाने ओळखला जात असे. प्रथमतः ब्रिटिशांनी येथे मार खाल्ला, नंतर १९१७ च्या मार्चमध्ये साम्राज्य सैनिकांनी येथे विजय संपादन करून पूर्वेकडील लढाअीला निराळा रंग चढविला. १९१८ मध्ये बसरा, बगदाद व मोसल हे तुर्कस्थानचे तीन प्रांत पूर्णपणे ब्रिटिशांच्या ताब्यात गेले. यावेळी या तीनही प्रांतात मिळून सुमारे वीस लाख अिराकी, पाच लाख कुर्दी, व तीन लाख असेरियन ख्रिस्ती मिळून सुमारे २८ ते ३० लाख लोकसंख्या होती. तुर्की राजसत्तेचा नाश केल्यानंतर तेथील राजकीय सत्तेचे नियंत्रण ब्रिटिशांनी करण्यास सुरुवात केली. कर्नल विल्सनने अेक योजना आखून या प्रांतातील सर्व सत्ता ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हाती देअून टाकली. अिराकची काय वाट लावायची यासंबंधी ब्रिटिश मुत्सद्यांत यावेळी बराच मतभेद होता. अिराकी लोकांच्या डोळ्यापुढेही काही निश्चित योजना नव्हती. त्यांना अेकच गोष्ट कळत होती, ती म्हणजे तुर्कांच्या गुलामगिरीतून निघून आपण ब्रिटिशांच्या गुलामगिरीत सापडलो अेवढीच होय! कर्नल विल्सनचा हेतू असा होता की, अिराक ब्रिटनच्या

संरक्षणाखाली घ्यावे व पुढे मागे त्याला साम्राज्यांतर्गत स्वराज्याचा दर्जा प्राप्त करून द्यावा. अिराकमध्ये पाश्चात्य सुधारणा व शिक्षण यांचा प्रसार करून अरब जमातींमधील प्रांतीय दुरभिमान काढून टाकून त्यांचे हितचिंतक म्हणून आपले बस्तान कायमचे तिथे बसवून द्यावे म्हणजे झाले. अेकीकडे अरबांना स्वातंत्र्य देण्याची घोषणा करून दुसऱ्या बाजूने कायमचे त्यांना डांबून कसे ठेवावे याची आखणी करण्याचे काम सुरू होते असे म्हणण्यास हरकत नाही. अिराक ब्रिटनच्या संरक्षणाखालील प्रदेश म्हणून राहणार असल्याचे बगदादमध्ये जाहीर होताच अिराकी लोक बंड करून अुठले. दोस्त राष्ट्रांनी आपणास फसविले अशी त्यांची ठाम समजूत झाली. आणि ती बऱ्याच अंशांनी खरीही होती. अिराकी लोकांनी केलेल्या बंडात कित्येक ब्रिटिश अधिकाऱ्यांची अमानुष कत्तल झाली, आणि युफ्रतीस नदीच्या मध्य भागाच्या प्रदेशावरील ब्रिटिश सत्ता संपुष्टात आली.

## क. लॉरेन्सचे अुद्‌गार

मुस्लीम राष्ट्रातील घडामोडींचे ख्यातनाम जनक टी अी लॉरेन्स यांनी १९२० साली लंडन टािअम्समध्ये लिहिले की, 'दोन वर्षांच्या ब्रिटिश राजवटीने अिराकी लोकांची सहनशीलता संपुष्टात आणली, यात आश्चर्य नाही. अिराकमध्ये आज प्रमुख जागांवरील सर्व अधिकारी ब्रिटिश असून त्यांची संख्या ४५० आहे. अेकही अिराकी मनुष्य महत्वाच्या हुद्द्यावर नाही. तुर्की साम्राज्यसत्ता तेथे असताना शेकडा सत्तर टक्के महत्वाच्या जागा तद्देशीय लोकांच्या हाती होत्या. आम्ही अिराकची थोडीफार भरभराट केली असेल, नाही असे नाही; पण तिच्यासाठी अिराकी लोकांना आपल्या स्वातंत्र्याची किंमत देणे कितपत मानवेल हा प्रश्न आहे,' कर्नल लॉरेन्ससारख्या ब्रिटिश साम्राज्यासाठी देह झिजविणाऱ्या तज्ज्ञाने,' तुर्क परवडला पण अिंग्लिश नको असे म्हणण्याची अिराकी जनतेला पाळी आली आहे' असे लिहावे, यावरून युध्दोत्तर कालात ब्रिटनकडून या देशाला काय वागणूक मिळाली असेल, याची निश्चित कल्पना येते. जुलै व ऑक्टोबर या महिन्यांच्या दरम्यान चाललेल्या झटापटीत सुमारे दोन हजार हिंदी व ब्रिटिश शिपाअी ठार झाले. सुमारे ९हजार अरबांचा निकाल लागला. या देशाचे भवितव्य अिराकी जनतेच्या हाती देण्यावाचून गत्यंतर नाही, ही गोष्ट या लढ्याने स्पष्ट झाली. ऑक्टोबरमध्ये परसी कॉकस याची नेमणूक या कामी करण्यात आली, व त्याने बगदादमध्ये येअून अिराकी पुढाऱ्यांना स्वतःचे मंत्रीमंडळ बनविण्यासाठी पाचारण केले. मि.बेल नावाच्या गृहस्थाने त्यावेळी लिहिले की, ''अरब राज्यघटना चिरायू होवो, अरबांना सत्ता द्या, त्यांचे प्रश्न तेच सोडवूद्यात! आपल्यासारख्या तिऱ्हाअितांनी हे काम करण्यापेक्षा त्यांचे तेच ते अधिक यशस्वी रितीने करू शकतील.'' ब्रिटिश सरकारने आपल्या दोन हजार व अरबांच्या ९हजार अशा ११हजार लोकांचा बळी देअून हा शोध लावला.

१९२१ साली कैरो परिषद भरली. माजी मुख्य प्रधान चर्चिल त्यावेळी वसाहतमंत्री होते. त्यांनी अिराकमधून ब्रिटिश सैन्य परत नेण्याचे ठरविले, पण बदल म्हणून शाही विमानदलाचे बस्तान तेथे बसवून दिले. थोड्या खर्चाचे पण सैन्यापेक्षा जास्त प्रभावी व कार्यक्षम असे आपले हत्यार अिराकच्या छातीवर रोखून शिवाय अज्ञ अिराकी जनतेचे धन्यवाद संपादन करण्याची अजब करामत चर्चिलसाहेबांनी करून दाखविली. ब्रिटिशांनी आपले सैनिक काढून घेअून अिराकच्या स्वातंत्र्याचा मार्ग खुला केला म्हणून अिराकी जनता खूश, तर सैन्याचा बाप विमानदलाच्या रूपाने अिराकच्या अुरावर बसवून पूर्वेकडील ब्रिटिश साम्राज्याशी वैमानिक दळणवळण सुलभ झाले म्हणून ब्रिटिश भांडवलशाही खूश! चर्चिलसाहेबांनी यावेळी अेका दगडात दोन पक्षी मारले यात मुळीच शंका नाही. असेरियन ख्रिश्चन लोकांना ब्रिटनने तुर्कांविरुध्द लढविले होते व युध्दोत्तर त्यांना स्वतंत्रपणे राहाता येअू शकेल अशी योजना करण्याचे अभिवचन दिले होते. या लोकांना ब्रिटिश विमानतळांचे संरक्षक म्हणून नेमण्यात आले. अिराकमधील हे लोक असल्याने अिराकी लोकांना हे ब्रिटिश सैनिक आहेत असे म्हणता येअीना. ते धर्माने ख्रिस्ती असल्याने मुसलमानांचा त्यांच्यावर दात होता, पण ब्रिटनच्या पंखाखाली ते

असल्याने अिराकी लोकांना खरोखर काही बोलता येअीना. ब्रिटिशांचे खरे सैन्य अिराकमधून गेले, पण त्या जागी हे भाडोत्री सैन्य  व शिवाय विमानतळ आले. शाही विमानदळाने दुसऱ्या महायुध्द कालात सैनिक व युध्दसामग्री अिराकमध्ये अुतरविण्याचा लावलेला धडाका पाहून अिराकी जनतेला कदाचित् २० वर्षांपूर्वीच्या कायरो परिषदेचा अिंगा कळून आला असेल. अिराकची गादी फैजल या अरब राजपुत्राला देण्याचे याच परिषदेत ठरविण्यात आले. अिंग्लिशांच्या या योजनेला विरोध करणाऱ्यांची अुचलबांगडी करण्यात येअून अखेर मक्केचा राजा हुसेन याचा मुलगा शेरीफियन राजपुत्र फैजल अिंग्लंडच्या साहाय्याने अिराकच्या गादीवर बसला.

## फैजलची कारकिर्द

फैजलला गादी म्हणजे अेक सुळावरची पोळी होती.! अिंग्लिशांच्या हातातील बाहुले म्हणून त्याच्या नव्या प्रजेचा त्याच्यावर विश्वास नव्हता. दमास्कसमधून आपण हाकून दिलेला राजा म्हणून सीरियातील फ्रेंच लोक त्याच्याकडे द्वेषबुध्दीने पाहात.तो सुन्नी म्हणून पर्शियातील शिया लोक त्याच्याबद्दल जळत, आणि शेरिफियन म्हणून नेजचा अिब्बेन सौद त्याचा अुघडअुघड द्वेष करी. परंतु या सर्वांच्या तोंडाला पाने पुसण्याची वस्तादगिरी फैजलजवळ होती. अिराक अेक स्वतंत्र अरब राष्ट्र  म्हणून शेजाऱ्या पाजाऱ्यांवर दरारा बसवून तर राहीलच, पण अिंग्लिशांनासुध्दा या राष्ट्राबद्दल आदर वाटेल असे करण्याची त्याची महत्वाकांक्षा होती. ब्रिटिशांचा आपल्याला पाठिंबा घेता यावा, पण त्यांच्या हातातील बाहुले म्हणून राहण्याचा प्रसंग मात्र येअू नये अशा बेताने तो नेहमी चाले. राज्यारोहणानिमित्त करण्यात येणाऱ्या भाषणामध्ये फैजलने देशातील अंतिम सत्ता ब्रिटिश हायकमिशनरच्या हाती असल्याचे जाहीर करावे, अशी तातडीची तार त्याला ब्रिटिश वसाहत कचेरीकडून करण्यात आली होती. पण 'आपण ब्रिटनशी केलेल्या तहाप्रमाणे स्वतंत्र राजे आहोत' असे सांगून ब्रिटनच्या मागणीला त्याने वाटाण्याच्या अक्षता लावल्या. अिंग्लंडने नाअिलाजाने १९२३ साली फैजलच्या या म्हणण्याला मान्यता दिली. १९२५ साली त्याने फ्रान्सशी तह करून सीरिया व अिराक यांमध्ये व्यापारी हितसंबंध प्रस्थापित करून घेतले. त्यानंतर थोड्याच दिवसांत पर्शियाशी संगनमत करून बगदाद-तेहरान रेल्वे रस्ता तयार करण्यात आला. अरबस्थानचा अिब्बेन सौद मात्र अद्यापि फैजलशी सहकार्य करू शकला नव्हता. या दोन राष्ट्रांच्या मर्यादा वाळवंटावर ठरवून घेणे मोठे कठीण काम होअून बसले होते, पण पुढे १९३० साली फैजल आणि अिब्बेन सौद अेकमेकांना भेटले व त्यानंतर त्यांच्यामध्ये मित्रत्वाचे नाते निर्माण झाले.

शास्त्रीय प्रगतीची अेकच लाट या सर्व मुस्लिम राष्ट्रांमध्ये युध्दोत्तर कालात अुठली होती. अिराक तिच्यापासून अलिप्त राहणे  अर्थातच शक्य नव्हते. या कालापर्यंत अिराकी लोक भटके व सामान्य शेतकरी म्हणूनच ओळखले जात व त्यामुळे कोणत्याही सशस्त्र टोळधाडीला ते सहजासहजी बळी पडत. अिस्लाम धर्म, समजुतींच्या फारशा आड  न  येणाऱ्या कित्येक पाश्चात्य सुधारणा फैजलने अंमलात आणण्याचे ठरविले. त्याने स्वतः मोटरने विमानाने प्रवास करून या वाहनांच्या संबंधी असलेल्या आपल्या प्रजेच्या वेडगळ कल्पना दूर केल्या; फैजलने स्वतः मोटारी व विमाने खरेदी केली. तो स्वतः पाश्चात्य पध्दतीचे कपडे परिधान करी. आपला धाकटा भाअू झेद व मुलगा गाझी यांना त्याने शिक्षणासाठी अिंग्लंडला रवाना केले.

## मोसलच्या तेलाच्या खाणी

मोसल प्रांताचा प्रश्न मात्र फैजलला बराच नडला. तुर्की अंमलाखाली शेकडो वर्षे असलेला हा प्रांत युध्दोत्तर कालात फ्रान्सला देण्याचे १९१६ साली ठरले होते.; परंतु ब्रिटिश संरक्षणाखाली तो जाण्याचे ठरताच फ्रान्सने मोसलवरील आपला हक्क सोडला. पण तो सोडताना त्या प्रांतातील तेलक्षेत्रामधून निर्माण होणाऱ्या नफ्याचा अेक चतुर्थांश भाग आपणास मिळावा असे ठरवून घेतले. या ठिकाणी अिराक पेट्रालियम कंपनी' स्थापन करण्यात आली. फ्रान्स अिंग्लंड अित्यादी  देशांमधून या कंपनीला अेक वर्षात अेक कोटि पौंड  अितके भांडवल मिळाले.

सीरियाच्या वाळवंटामधून नळ टाकण्यात येअून मोसल प्रांतातील तेल हैफा या अिंग्लिश व ट्रिपोली या फ्रेंच बंदरात नेण्यात आले. अिराकच्या नवीन राजवटीला या तेल कंपनीकडून मिळणारी खंडणी बहुमोल होती. मोसलमध्ये शांतता नांदली तर ही खंडणी नियमितपणे मिळणार, नाही तर दंग्याधोप्याचे निमित्त करून पाश्चात्य लोक आपल्या हितसंरक्षणार्थ म्हणून मोसूल विभागात आपले सैन्य आणून तेथील आपली सत्ता व खंडणी या दोहोंवरही गदा आणणार याची कल्पना फैजलला होती.

मोसूलची मूळ संस्कृती असीरियन आहे. अरेबियन संस्कृतीचा गंधही तेथे नाही. तेथील मूळचे लोक कुर्द या नावाने ओळखले जातात. आणि त्यामुळे युध्दोत्तर कालात अरबांवरील सत्ता सोडून देण्यास कबूल झालेल्या तुर्कस्थानने मोसूलवर आपला हक्क सांगितला होता. या भागात राहणारे पाच लाख व झोगा पर्वताच्या अुत्तरेस राहणारे तीन लाख अशा आठ लाख कुर्दी लोकांना अेकत्रित करून त्यावर आपली सत्ता व संस्कृती फिरून लादण्याचा तुर्कस्थानचा विचार होता. यावर दोस्त राष्ट्रांनी तोडगा काढला की, 'अुत्तर कुर्दिस्तान स्वतंत्र राहील, पण मोसूलच्या कुर्दी लोकांनी त्यात सामील व्हावे की नाही हे आम्ही काही सांगणार नाही.' तुर्कस्थानने याला मान्यता न दिल्याने दोस्त राष्ट्रांनी निकाल दिला की,मोसूल लष्करी दृष्ट्या महत्त्वाचा भाग असल्याने अिराक या नवीन राष्ट्राला त्याची आवश्यकता आहे व तो त्यात समाविष्ट करण्यात येअील. कुर्दी व अिराकी यांचे सुरुवातीपासूनच हाडवैर असल्याने कुर्दी लोकांनी याला कसून विरोध केला.

ब्रिटिशांनी या संधीचा बरोबर फायदा घेअून कुर्दी लोकांचा बीमोड करण्याच्या निमित्ताने आपले लष्कर मोसूल प्रांतात घुसवून तेथील सर्व सत्ता आपल्या हाती घेतली, व कुर्दी लोकांची हाडे साफ करून अिराकच्या तोंडाला मोसूलपुरती पाने पुसली. असीरियन ख्रिस्ती लोकांना मातृभूमी पैदा करून देण्याचे वचन देण्यात आले होते. त्यांनाहीपण अिराकमध्येच कोंबण्यात आले. थोड्या खर्चात ब्रिटिश विमानतळांचे संरक्षण करण्यासाठी यांची भाडोत्री सेना अुभारण्यात आली होती. पण १९३३ साली अिराकचे ब्रिटिश संरक्षण संपल्याने ब्रिटनचे अिराकमधील राजकीय हितसंबंध बरेचसे खालावले. आपला कार्यभाग संपताच असीरियन ख्रिस्ती लोकांना दिलेली वचने ब्रिटिश विसरले व त्यांनी अिराकमध्ये असाहाय लोकांवर अितका भयानक सूड अुगवून त्यांची कत्तल केली की, या अमानुष प्रकाराने धक्का बसून फीजल १९३३ च्या सप्टेंबर महिन्यात मरण पावला. मोसलवर अिराकची संपूर्ण सत्ता प्रस्थापित करण्याच्या कामी जरी त्याला अपयश आले तरी अेकंदरीत पाहता त्याची कारकिर्द यशस्वी झाली असे म्हणण्यास हरकत नाही. अिराक ब्रिटिश संरक्षणाखाली असताना त्याने राजपद घेतले. १९२३साली तह करून त्याने ब्रिटिश लष्करी संरक्षण घेण्याचे ठरविले. १९३० साली अँग्लो अिराकी तह होअून अुभय राष्ट्रांनी युध्दप्रसंगी परस्परांना साहाय्य द्यावे, अिराकमधील वाहतुकीची साधने विमानतळ ब्रिटिश सैन्याला अशा प्रसंगी वापरण्यास मिळावेत असे या तहाने ठरले. याच तहानुसार अिराकमध्ये ब्रिटिश सैन्य दुसऱ्या महायुध्दकालात अुतरविण्यात आले. १९३२ साली अिराक राष्ट्र स्वतंत्र म्हणून राष्ट्रसंघाचा सभासद झाला. फैजल निधन पावला, तेव्हा त्याचे कार्य पूर्णांशाने सफल झाले नव्हते. मोसूल प्रांतातून निघणाऱ्या व हैफाला जाणाऱ्या तेलाच्या नळांनी त्याच्या देशाला अद्यापि पाश्चात्य भांडवलशाहीशी जखडून ठेवले होते.

## अलीकडचे अंतःस्थ राजकारण

फैजलनंतर त्याचा मुलगा गाझी गादीवर आला. त्याचे शिक्षण कैरोलाच झाले असल्याने ब्रिटनच्या राजकीय व्यवहाराचे त्याला चांगलेच ज्ञान झाले होते. ब्रिटन आपल्या कार्यासाठी आपल्या छोट्या देशाला वेढल्याशिवाय कधीही राहणार नाही याची जाणीव त्याला होती, व त्यावर अिलाज करणे मात्र त्याच्या शक्तीबाहेर होते. त्याच्या कारकिर्दीच्या पहिल्याच महिन्यामध्ये सर टी विल्सनने लिहिले की, 'बगदाद आणि बसरा ही ठिकाणे पूर्वेकडील ब्रिटिश साम्राज्याशी वैमानिक दळणवळण ठेवण्याच्या दृष्टीने ब्रिटनला अत्यंत महत्वाची आहेत. आमच्या समुद्रमार्गाला सुवेझ कालव्याचे जितके महत्व आहे, तिततकेच आकाशमार्गाला या ठिकाणचे आहे.' सुवेझ आणि बगदाद बसरा यांची विल्सनसाहेबांनी केलेली

तुलना गाझीला अगदी सूचक वाटून धक्का बसला. सुवेझ कालव्यावर ब्रिटनने ठेवलेले वर्चस्व बगदाद-बसऱ्यावरही राहणार हाच याचा अर्थ होता. १९३६ साली युरोपमध्ये अिटली-जर्मनी गट्टीला वाचा फुटली व या दोन राष्ट्रांनी आपले संबंध पूर्वेकडील देशांत वाढविण्याची खटपट सुरू केली. अिराक पूर्वेकडील महत्वाचे तेलक्षेत्र असल्याने व याचवेळी अिटलीच्या पेट्रोलवर नियंत्रण घालण्याचे ब्रिटनने ठरविल्याने अिराकमध्ये अिटली-जर्मनीच्या हालचाली सुरू झाल्या. अेकेकाळी तुर्कस्थानच्या सैन्यात अधिकारी असलेल्या सिद्दीकी पाशाने अिराकमध्ये कुर्दी लोकांच्या साहाय्याने बंड पुकारून स्वतःचे सर्वाधिकारित्व तेथे प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू केला. गाझीने ब्रिटिश वकिलातीकडे धाव घेतली पण अिराक आता स्वतंत्र राष्ट्र म्हणून वावरत असल्याने या अंतर्गत यादवीत ब्रिटनला अुघडपणे हात घालता येअीना. शेवटी गाझीने आपला संरक्षणमंत्री जाफर पाशा याला सिद्दीकीकडे निरोप देअून पाठविले, पण सिद्दीकीने त्याचा खूनच केला. सिद्दीकीने स्वतःला सर्वाधिकारी म्हणून जाहीर केले. अिटलीकडून विमाने खरेदी केली, व बर्लिनला दौरा काढला. या संधीचा फायदा गाझीने घेतला. त्याला कोठून तरी गुरुमंत्र मिळताच त्याने सिद्दीकीला तो परत येताच समेट करण्याची आपली तयारी असल्याचे सांगून त्याला मोठ्या सन्मानाने बोलावून घेतले व त्याचा खून पाडला.

## अिराकच्या अुत्पन्नाचा झरा

अिराकचे खरे अुत्पन्न म्हणजे मोसूलच्या तेलक्षेत्राच्या वहिवाटीबद्दल युरोपियन कंपन्यांकडून मिळणारा खंड होय. आणि या कंपन्यांमधून अिंग्लिश भांडवलदार वर्गाचा बराच हात असल्याने, गाझीला अिंग्लंड व अिंग्लंडला गाझी यावाचून सत ना गत अशी स्थिती होती. सिद्दीकीने जाफरचा खून करताच नूरी पाशा या अिराकच्या मुख्य प्रधानाला आपल्या जीविताची काळजी वाटू लागली व म्हणून त्याने अिंग्रजांचा आश्रय घेतला. अिंग्रजांनीपण त्याला अिराकमधून सुरक्षितपणे बाहेर काढून आपणाकडे ठेवून घेतले. अशा परागंदा लोकांना अिंग्रज नेहमीच आश्रय देत असते. कारण पुढे मागे त्यांचा अुपयोग होण्यासारखा असतो. हेलेसेलासीचा त्यांनी असाच अुपयोग करून घेतला आहे व १९३९ साली नूरी पाशाचा करून घेतला. गाझी अिराकचा राजा या साली मोटर अपघातात सापडून मरण पावला, व ही गादी त्याचा चार वर्षांचा अल्पवयी मुलगा दुसरा फैजल याला देण्यात आली. अर्थात या अज्ञान राजाचे पालकत्व नूरीकडे व पर्यायाने अिंग्लंडकडे येअून फिरून अेकदा अिराकमध्ये ब्रिटिशांचे वर्चस्व चांगले प्रस्थापित झाले. यासंबंधी लिहिताना जॉन गंथर म्हणतो,
-

Nominally independent state. It has an infant king run by British

दुसऱ्या महायुध्दात अिराकने फिरून ब्रिटिशांविरुध्द अुचल खाल्ली. रशीदअल्ली जर्मन पाठिंब्याच्या जोरावर अिराकची ब्रिटिश नियंत्रित राजवट अुलथून पाडण्यासाठीच बंड करून अुठला, पण अिंग्लंडने त्याला पळवून लावले. अिराण अिराक सर्वच अरब प्रदेशावर अिंग्लंडने वर्चस्व प्रस्थापित करून तेथून रशियाशी हातमिळवणी केली. त्यामुळे युध्दोत्तर कालात फिरून अिराकचे राजकारण ब्रिटिशांच्याच हाती राहिले. अिराकमध्ये ब्रिटिश तंत्राने चालणारी लोकसत्ताच आहे.

●●●

## ५. अिराण

आतापर्यंत चर्चिलेले बहुतेक मुस्लीम प्रदेश आटोमन अर्थात तुर्की साम्राज्याचे भाग म्हणून कधी ना कधी होते,पण प्रशिया मात्र या साम्राज्यसत्तेखाली कधीच नव्हता. या देशाचे आर्थिक संबंध तुर्कस्थानशी निगडीत होते. या देशाच्या अितिहासाचे तुर्कस्थानच्या अितिहासाशी साम्यही भरपूर आहे आणि म्हणून तुर्की साम्राज्यातील अितर देशांमध्ये याचा समावेश नसूनही त्याचा अितिहास येथेच पाहण्यास हरकत नाही. रशियन आणि ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या कारवाअीला विसाव्या शतकाच्या आरंभी पर्शिया एकदा बळी पडला. दुसऱ्या महायुध्दकालाप्रमाणेच १९०७ साली रशिया व ब्रिटन यांनी अनुक्रमे अुत्तर व दक्षिण पर्शिया आपापसात वाटून घेतला. १९१७ साली रशियाने परस्पर मार खाल्ल्याने व झारशाही नष्ट झाल्याने ब्रिटनचे परराष्ट्रमंत्री लॉर्ड कर्झन यांचे आयतेच फावले. पर्शियाच्या आखातापासून कॅस्पियन समुद्रापर्यंत ब्रिटिशांचा ताबा त्याला दिसू लागला. हिंदुस्थानची सरहद्द सुरक्षित करण्यासाठी अेवढा मोठा प्रदेश ब्रिटिशांच्या हाती येणारा, हा अेक मोठा शुभलाभच त्याला वाटला. १९१८ मध्ये तुर्की फौजा ब्रिटिशांनी पर्शियाच्या सरहद्दीपासून पिटाळून लावल्या आणि पर्शियातील महत्वाच्या ठाण्याचा लष्करी बंदोबस्त करून टाकला. १९१९ मध्ये पर्शियाच्या शहाला ब्रिटिशांशी तह करून पर्शियाची लष्करी व राजकीय सत्ता त्यांच्या स्वाधीन करणे भाग पाडले, व लॉर्ड कर्झनला आपले सुखस्वप्न खरे ठरल्याबद्दल आनंद झाला. पण लौकरच या सुखस्वप्नाचा नाश झाला. पर्शियाचा अुत्तर प्रांत मिलन १९२० साली बोल्शेव्हिकांनी काबीज केला. पर्शियातील अिंग्रजांची वस्ती म्हणजे आपल्या शिरावरील लटकती तलवार हे ते ओळखून होते. याच साली त्यांनी तेथे समाजसत्तावादी पध्दती अंमलात आणून टाकली. आणि नंतर मॅन्झेड्रन या सुपीक प्रांताच्या दिशेने आपली चढाअी पुढे चालू केली.

मॅन्झेरीन प्रांताच्या शेतकरी कुळात जन्मलेला अेक तरुण पर्शियन कोसॅक लढवय्या त्यावेळी तेथे होता. आपल्या देशाची फिरून पूर्वीप्रमाणेच वाट लागणार याची त्याला कल्पना आली. १९३१ साली तो आपल्या फक्त तीन हजार अनुयायांनिशी तेहेरानमध्ये आला. महत्वाचे अधिकारी त्याने पकडले, व शहाला आपणास युध्दमंत्री व सेनापती नेमण्यास भाग पाडले. पर्शियाची सर्व लष्करी सूत्रे आपल्या हाती घेतली. ब्रिटिशांशी केलेला तह त्याने अमान्य केलाच, पण गिलेजची समाजसत्तावादी लोकराज्य पध्दतीही नष्ट करून टाकण्यात आल्याचे त्याने जाहीर केले. या नव्या लढवय्याचे नाव रझाखान. कित्येक वर्षे तो पर्शियाच्या कोसॅक पलटणीत होता. या पलटणीची सूत्रे झारच्या सैन्याधिकाऱ्यांकडून पूर्वी हलविली जात असत. आपल्या पाठीशी असलेल्या मूठभर अनुयायांच्या जोरावर व पर्शियाबद्दल त्याला वाटणाऱ्या आत्यंतिक प्रेमावर त्याने आपले कारस्थान यशस्वी केले, व पर्शियाची सूत्रे आपल्या हाती घेतली. १९२३ ऑक्टोबरला त्याने पर्शियाचे पंतप्रधानपद घेतले आणि शहा युरोपच्या दौऱ्यावर निघाला. अिकडे अगदी त्याच दिवशी अेका वीराने आपण तुर्की लोकराज्याचे अध्यक्ष आहोत म्हणून फतवा काढला. रेझाखानला ही कल्पना अत्यंत आवडली. त्यालाही आपण हाच मार्ग अनुसरावा असा मोह पडला. पण नास्तिक तुर्कांचा मार्ग अनुसरण्याचे धाडस त्याला अेकदम होअीना. मुस्लीम धर्माचे त्याच्या मनावरील दडपण जबरदस्त होते. १९२५ पर्यंत लोकशाही नाही, राजसत्ता नाही अशा अर्धवट स्थितीत पर्शिया होता.

या साली घटना समितीने रेझाखानला शहा म्हणून मान्यता दिली. हे पद स्वीकारण्यास तो सर्वस्वी लायक होता. आपल्या सत्तास्वीकारापासून अवघ्या चार वर्षांत त्याने पर्शीयामध्ये कायदा व सुव्यवस्था यांची स्थापना करून टाकली.सरंजामी पुंडांना अेकामागून अेक असे नाहीसे केले. ब्रिटिशांनी 'दक्षिण पर्शियन रायफल्स' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सैन्यविभागातून आपले लष्करी अधिकारी काढून घेतले. शॅत अेल् अरब या विभागावर स्वतंत्र मालकी गाजविणारा शेख केसल यानेही तेहरानच्या नव्या सरकारला मान्यता देअून आपली सत्ता त्याच्या अधिकारक्षेत्रात घेण्यास मान्यता दिली. या

विभागात उत्तम खनिज तेल असल्याने ब्रिटिशांनी त्याला संरक्षण देअून आतापर्यंत 'अँग्लो पर्शियन तेल कंपनीचा' सवता सुभा तेथे चालू ठेवला होता. तेहरान सरकारच्या आश्रयाला जाअून शेख केसलने ब्रिटिशांना चांगलेच गोत्यात आणले.

पर्शियाने आपले स्वातंत्र्य संपादन केले, पण स्वातंत्र्य टिकविण्यास आधुनिक साधनांचा अुपयोग केल्याशिवाय गत्यंतर नाही, ही गोष्ट कोणासही विसरून चालत नाही. रेझा शहाने पाश्चात्य राज्यशास्त्राच्या सर्व गोष्टी हाताळण्याचा प्रयत्न केला पण आपल्याला पाश्चात्य तज्ज्ञांची मदत घेतल्याशिवाय चालणार नाही हे तो कळून चुकला. यासाठी हे शास्त्रज्ञ आणायचे म्हणजे फिरून त्यांनी आपल्याबरोबरच आपल्या पोतडीतून आणखी काही खेकटी आणलीच म्हणून समजावे व यालाच रेझाखान भीत होता. पर्शियन लोक ही सुधारणा स्वतःच घडवून आणतील अशी आशा करण्यास कोठेच जागा नव्हती. जगात आळशी आणि बेशिस्त अशी कोणाची ख्याती असेल तर ती पर्शियनांची! अद्यापि त्यांचा चौथा हिस्सा लोक भटक्या आयुष्यक्रमाला चिकटून आहेत. तुर्कस्थानप्रमाणे पाश्चात्य बुध्दिवाद्यांचा वावर या प्रदेशात कधीच नव्हता. व त्यामुळे रेझाखानला मोठा पेच येअून पडला. नाअिलाजाने त्याने पाश्चात्य तज्ज्ञ आणून त्यांच्या हाती महसूल खाते सोपविले. व त्यावर मुख्य म्हणून डॉ. मिल्स पॉ याची नेमणूक केली; तर शिक्षण खात्यावर फ्रेंचांची देखरेख ठेवली. जकातीची व्यवस्था बेल्जियम तज्ज्ञांच्या हवाली केली. येथपर्यंत सर्व ठीक झाले. या गोष्टींत रेझाखानला धोका असा कोठेच नव्हता. रशिया आणि अिंग्लंड यांच्याशी व्यवहार करताना मात्र त्याला काय ती खरी काळजी घ्यायची होती. ट्रान्स कॉकेशिया व ट्रान्स कॅस्पियन ही दोन लोकराज्ये आता सोव्हिअेट रशियात समाविष्ट झाली होती. आणि सोव्हिअेटमधून पर्शियन आखाताकडे दळणवळण वाढविण्यासाठी रशियन सरकारची धडपड चालू होती. अँग्लो पर्शियन तेल कंपनी ब्रिटिशांची असून तीमध्ये सुमारे वीस हजार पर्शियन लोक राबत होते. त्यांनी 'रामूझ'पासून आबादाव बेटापर्यंत तेलाचे नळ टाकले असून त्या ठिकाणी तेलाचे शुध्दीकरण करण्याचा प्रचंड कारखाना व बंदर अुभारण्याचे त्याचे काम चालू होते. याशिवाय बगदाद ते तेहेरान रेल्वे रस्ता आणि हिंदुस्थान ते पर्शिया आकाशमार्ग यासाठी ब्रिटिशांनी खटपट चालविली होती, ती निराळीच! रशिया आणि अिंग्लंड यांचा प्रत्यक्ष राजकीय स्वार्थ पर्शियाशी निगडीत असल्याने या दोन राष्ट्रांशी डोळ्यात तेल घालून व्यवहार करणे रेझाखानाला भाग होते.पर्शियाला दळणवळणाची साधने अद्ययावत् व विपुल करण्याची फार आवश्यकता होती. १९२४ साली डॉ. मील्स पॉ लिहितो, 'वाहतुकीच्या साधनांच्या अभावी पर्शियाच्या अेका भागात ज्यादा गहू व बार्ली सडून जात असते, तर दुसऱ्या भागात दुष्काळाने लोक अुपासमार काढीत असतात.'

दळणवळणाची साधने कोणा परकीयांच्या नियंत्रणाखाली जाअू नयेत ही रेझाची अिच्छा होती आणि ती सयुक्तिक होती. मोठ्या कौशल्याने रेझा शहाने अिंग्लंड रशियाला अेकमेकांविरुध्द खेळविण्याचा डाव टाकला. त्यानी अिंपीरियल अेअरवेज् या इंग्लिश कंपनीला कैरो - कराची मार्गावरील काही विमानतळ पर्शियामध्ये बांधू दिले, पण तळावर आपली मालकी राहील अशी अट घातली. त्याने बगदाद-तेहेरान रेल्वे बांधण्याची परवानगी देण्याचा आव आणून नुसत्या साध्या रस्त्यालाच मान्यता दिली. याचवेळी रशियालाही त्याने तेहरान-मॉस्को आकाशमार्गाला परवानगी दिली व कास्पियन समुद्रापासून पर्शियाच्या आखातापर्यंत रेल्वे रस्ता तयार करण्याचे वचन दिले. या रेल्वेचे अुत्तरेकडील शेवटचे ठिकाण कास्पियनवरील रशिया नियंत्रित प्रदेशापासून दूर राहावे व दक्षिणेकडील टोक अिंग्लिश नियंत्रित प्रदेशापासून दूर राहावे अशी दक्षता बाळगण्यास तो विसरला नाही. प्रथम दक्षिण शेवट त्याने शॅत अेल अरमध्ये मोहमारा येथे करण्याचे ठरविले होते. पण हे ठिकाण अिराकच्या जवळ असल्याने व अिराकमध्ये ब्रिटिशांचे वर्चस्व असल्याने हे ठिकाण बदलून त्याने खोरामासा हे पर्शियन आखाताच्या खाडीवरील ठिकाण शेवटी त्याने पसंत केले. १९३७ साली खुद्द बादशहा पाचवे जॉर्ज यांच्या हस्ते या रेल्वेच्या दक्षिण भागाचा उद्घाटन समारंभ झाला. याला अनुलक्षून लिहिताना लंडन टाअिम्स म्हणतो, ' राजेसाहेबांची खास

गाडी दोनदा रुळावरून घसरलीच आणि शेवटी अिंजिनच पेटले.' - काही असो, अिंग्लंड-रशियाशी रेझाखानने मोठ्या कौशल्याने आपला डाव खेळला यात शंका नाही. पर्शियामध्ये थोडीफार दळणवळणाची साधने त्याने उभी केली, व तीही परस्पर अिंग्लंड-रशियाच्या खर्चाने! आणि हे करीत असताना आपल्या देशाच्या राजकीय स्वातंत्र्याला त्याने कोठेच बाध येअू दिला नाही हे विशेष होय.

आर्थिक दृष्ट्या पर्शियाला स्वावलंबी करणे ही गोष्ट मात्र बरीच कठीण होती. पर्शियाची आर्थिक स्थिती जरी हलाखीची नव्हती तरी चांगली मात्र खास नव्हती. तेथील लोकांचे जीवनध्येय हिंदी लोकांपेक्षा वरच्या दर्जाचे होते, पण पश्चिम युरोपातील लोकांच्या मानाने ते कमी होते. गव्हाची रोटी, खवा, मांस, अंडी अित्यादी पदार्थ पर्शियन शेतकऱ्यांच्या नेहमीच्या खाण्यात येत. अगदी गरीबांतील गरीब शेतकरी बार्लीची भाकरी खात असे. साखर आणि चहा अतिशय महाग असला तरीसुध्दा या दोन वस्तूंचा खप फारच मोठ्या प्रमाणात होत असे. फळफळावळ अुत्तम व विपुल असून अन्नात चरबीचा उपयोगही मोठ्या प्रमाणात होतो. पर्शियाचे सर्वसाधारण जीवन समाधानकारक आहे असे म्हणण्यास मुळीच हरकत नाही. अे टी विल्सन यांनी आपल्या 'पर्शिया ' या पुस्तकात वरील अभिप्राय प्रकट केला आहे. अितके असूनही पर्शिया सर्व बाबतीत स्वावलंबी नाही. कापसाचे कापड, यंत्रसामग्री, साखर या वस्तू त्यांना बाहेर देशांतून आणाव्या लागतात. या बाबतीत परदेशांच्या तोंडाकडे पाहावे लागू नये म्हणून पर्शियाच्या शहाला अिच्छा असली तरी करता येण्याजोगे मात्र काही नव्हते. कापसाच्या कापडाबाबत त्याने थोडीफार धडपड करून सुमारे सात गिरण्या उभ्या केल्या व परदेशी कापडाची आयात कमी केली. पण दुसऱ्या दोन वस्तूंची आयात करण्यावाचून गत्यंतरच नव्हते. आपल्या आयातीला तोलून धरण्यासाठी त्याने गालीचे, तेल, फळे, अफू यांची निर्यात चालू केली. आपल्या तेलाच्या व्यापारासाठी त्याला ब्रिटनवर विसंबून राहावे लागले. ॲग्लो-पर्शियन तेल कंपनीकडून मिळणारा पैसा पर्शियन वसूलाच्या चौथ्या हिश्श्याने असतो, पण याच कंपनीने आपल्या परदेशी भागीदारांना दरसाल नफ्याच्या रूपाने दिलेल्या पैशाच्या मानाने तो कितीतरी कमी असल्याने पर्शीयन लोकांना ही बाब जरा सलतच असते. फळे व गालीचे यांच्या निर्यातीबाबतही पर्शियाला परदेशांवर व विशेषतः रशियावर अवलंबून राहावे लागते. अफूचीही तीच अवस्था! अफूसंबंधी कोणाचा फारसा अनुकूल ग्रह नसल्याने, यावी तशी मागणी तिला येत नाही. राष्ट्रसंघाने मोठ्या अगत्याने पर्शियाला सुचविले, 'पर्शियात अफूची लागवड कमी करून अितर काही चांगली पिके अधिक प्रमाणांत काढल्यास बरे होअील.' रेझाखानने सांगितले, 'अफूची लागवड कमी करण्यास आपली केव्हाच तयारी आहे; पण अितर राष्ट्रांनी आपल्या संरक्षक जकाती दूर करून पर्शियाच्या अितर मालाला मात्र वाव करून द्यावा.' अर्थात या दोनही गोष्टी राहून गेल्या हे निराळे सांगण्याचे कारणच नाही.

रेझाखानने पर्शियाचा अंतर्गत कारभार फारच व्यवस्थितपणे चालविला व त्याबद्दल त्याचे कोणीही आदरपूर्वक कौतुकच करील. १९२१ च्या पूर्वी शहाच्या सरकारचा शब्द तेहरानच्या भिंतीपलीकडे कोणीही जुमानावयास तयार नव्हता, पण पुढे पर्शियाच्या प्रत्येक प्रांतात तो मोठ्या आदराने झेलला जाअी. फ्रान्सच्या तिप्पट असलेल्या पर्शियाच्या मुलखातील लोकसंख्या काय ती सुमारे १.२० कोटि आहे, आणि ती अेवढ्या प्रचंड प्रदेशावर अितस्ततः पसरली आहे. केमाल पाशाच्या कारकिर्दीत तुर्की लोकसभेला अगर मुसोलिनीच्या कारकिर्दीत अिटालियन लोकसभेला जे महत्व होते, तेच शहाच्या कारकिर्दीत पर्शियन लोकसभेला होते. पर्शियापाशी उत्तम रितीने सज्ज असे सुमारे सत्तर हजार सैनिक होते व हेच काय ते रेझाखानचे व पर्शियाचे खरे सामर्थ्य! रेझाखानने सैन्यभरतीचे आखलेले धोरण अुलेमांना मान्य झाले नाही. कुराणाच्या विरुध्द ही बाब घडते आहे असे त्यांचे म्हणणे पडले, पण रेझाखानने मोठ्या सन्मानाने त्यांना बोलावून घेअून व मोठ्या आदराने वागवून त्यांची समजूत काढली व मग उलेमांनी त्याला संमती दिली.

भटक्या जमातींमधूनच पर्शियाच्या खऱ्या शिपायांचा भरणा होतो. या लोकांतील लष्करी गुण तर शाबूत राहावेत पण भटकेपणा, बेशिस्त वागणूक, कोणाच्या ताब्यात न

राहण्याची व लुटालूट करण्याची प्रवृत्ती  हे दोष मात्र नाहीसे व्हावेत म्हणून रेझाखानला अतिशय खटपट करावी लागली. या भटक्या जमातींना शक्यतो स्थायिक आयुष्य काढण्याची सवय लागावी म्हणून त्याने कित्येकांना शेताभातात घातले, तर कित्येकांना गुरामेंढरांचे कळप पाळून राहण्यास लावले.

युध्दोत्तर कालातील पर्शिया व तुर्कस्थान यांच्या अितिहासात बरेचसे साम्य आहे. दोन्ही देशांतील राष्ट्रीय क्रांतीचे श्रेय शिपाअी बाण्याच्या व्यक्तींना आहे. पाश्चात्य सुधारणा हस्तगत करून परकीय भांडवलशाहीचे जोखड झुगारून देण्याचा प्रयत्न दोघांनीही केला आहे. परकीयांबद्दल संशयी वृत्ती दोघांनीही प्रगट केली आहे. पर्शियाने तर १९३३ साली आपल्या उच्च दर्जाच्या अधिकाऱ्यांनी युरोपियन स्त्रियांशी ओळखदेख अगर संबंध ठेवू नयेत असा कायदाच पास केला होता. मुस्ताफा अुतावळा, व काय वाटेल ते करून विरोध दडपून टाकणारा होता; तर रेझाखान आपल्या उमद्या स्वभावाने व प्रेमळ वागण्याने विरोध विरघळून टाकणारा होता, एवढेच काय ते भिन्नत्व या दोन व्यक्तींमध्ये होते. तुर्कांनी मुस्लीम संस्कृती  मुळातच उखडून टाकली, पर्शिया तितका पुढे गेला नाही. धार्मिक न्यायालये त्याने बंद केली, पण विवाह अगर काडीमोड यांसंबंधीचे धार्मिक कायदेच त्याने कायम ठेवले.

१९३५ साली पर्शियाने अधिकृत रित्या आपणाला अिराण ही संज्ञा घेअून आपले खरे राष्ट्रीयत्व प्रकट केले. आपल्या देशातील तुर्की लोकांची अफगाण व अरब लोकांशी राजकीय युती घडवून आणून मध्य आशियातील युरोपियन दडपण उखडून काढावे ही रेझाखानची मनीषा होती व त्या दृष्टीने त्याची खटपटही सुरू होती. अंगोराला त्याने एकदा भेटही दिली. अिराणमध्ये रशिया, जर्मनी, अिंग्लंड अित्यादी सर्व राष्ट्रांचे हितसंबंध त्याने या ना त्या निमित्ताने गुंतवून पाडले असल्याने अिराणच्या स्वतंत्रतेबद्दल प्रत्येकाला आस्था वाटण्याची पाळी आली. युरोपात १९३९ साली महायुध्द चालू झाल्यानंतर अिराणने आपली तटस्थता जाहीर केली. जर्मनी-अिंग्लंड युध्द चालू असताच रशिया-जर्मनी युध्द भडकले. अिराणमध्ये अेका काळी स्पर्धा करणारी अिंग्लंड व रशिया ही दोन राष्ट्रे एकाच गटात आली. रेझाशहाला या दोन प्रबळ राष्ट्रांनी पळवून लावून दक्षिणेकडून ब्रिटिश व उत्तरेकडून रशियन फौजांनी हा देश व्यापला व अितिहासाची पुनरावृत्ती झाली.

युध्दोत्तर कालात अमेरिका, ब्रिटन व रशिया या तीनही राष्ट्रांनी  आपापल्या फौजा अिराणमधून परत काढून घेतल्या व मजलीस या अिराणमधील लोकसभेमार्फत अिराणचा राज्यकारभार चालू झाला. मध्यंतरी अझरबजान प्रांतातील लोकांनी बंड केले व या बंडवाल्यांना रशियाची फूस असावी असा गिल्लाही अितर राष्ट्रांनी केला होता.आता रशिया व अिराणमध्ये तेलासंबंधी वाटाघाटी चालू असून अमेरिका तेथे रशियाला आडवे पडण्याचा विचार करीत आहे. या प्रश्नाबाबत अद्यापि बरीच घासाघीस चालू आहे. रूसो-पर्शियन तेल कंपनी स्थापन होण्याच्या मार्गात अमेरिका वारंवार खीळ घालीत असल्यानेच बहुधा रशिया पॅलेस्टाअीनमध्ये अमेरिकेच्या निर्णयाला मान्यता देऊन अिराणचा सौदा पदरात पाडण्याच्या विचारात असावा.

●●●

## ६. अफगाणिस्थान, आणि समारोप

विसाव्या शतकाच्या आरंभी सर्वच मुस्लीम राष्ट्रांमध्ये सुधारणेची व राष्ट्रीयत्वाची जाणीव होऊन त्या दृष्टीने खटपटी सुरू झाल्या या खटपटींना सर्वच देशांत यश आले असे मात्र नाही. खुद्द अफगाणिस्थानात या खटपटींना अपयश आले. अफगाणिस्थानला रशिया आणि अिंग्लंड या दोन प्रबल सत्तांमधील छोटे राष्ट्र म्हणून फार महत्व होते. अफगाणिस्थानचे राजकारण या दोन राष्ट्रांपैकी कोणाचे अधिक वजन त्यावर पडेल त्याला अनुसरून चाललेले असे, -अद्यापि असते. १९१७ साली रशियन राज्यक्रांतीमुळे झारशाही नष्ट झाली व अफगाणिस्थानचा राजा अमानुल्ला याला रशियापासून भीती राहिली नाही. स्वाभाविकच अिंग्लिशांच्या तोंडाकडे पाहून चालण्याची त्याला गरज राहिली नाही. याशिवाय मुस्लीम राष्ट्रांचे पुढारीपण असलेल्या तुर्कस्थानशी ब्रिटिशांचे हाडवैर असल्याने अमानुल्ला त्यांच्यावर राग धरून असावा हे स्वाभाविकच होते. हिंदुस्थानमध्ये १९१९ साली पसरलेल्या असंतोषाचा फायदा मिळाल्यास पाहावा म्हणून या सालात अमानुल्लाने खैबर घाटातून हिंदुस्थानवर मोहीम काढली. या मोहिमेचा महात्माजींशीही संबंध जोडण्यात आला होता.पाश्चात्य शिपायांबरोबर सामना करण्याचे दिवस आता संपले होते. या प्रकरणात रशियाने चोरून अफगाणिस्थानला जरी भर दिली होती, तरी ब्रिटिश विमानांपुढे व यांत्रिक बंदुकांपुढे अफगाणांचा टिकाव लागणे शक्य नव्हते. अमानुल्लाला ब्रिटिशांबरोबर तह करणे भाग पडले. पण भाग्य त्याचे की, तहाच्या कलमात ब्रिटिशांनी अफगाणिस्थानच्या परराष्ट्रीय राजकारणावर आपले नियंत्रण ठेवण्याची अट घातली नाही. यानंतर त्याने रशियाशी तह केला.

अमानुल्ला ब्रिटिशविरोधी असल्याने अफगाणिस्थानच्या राजकारणात रशियाचे प्रस्थ वाढू लागले. केमालपाशा किंवा रेझाखान यांच्याप्रमाणे आपणही अफगाणिस्थानात सुधारणा घडवून आणावी असा मोह त्याला झाला, पण अिस्लाम धर्माशी एकरूप झालेली त्याची सनातनी जनता त्याच्या सुधारणा स्वीकारण्यास तयार नव्हती. १९२३ साली अफगाणिस्थानात त्याच्याविरुध्द पुष्कळ दंगे झाले. यानंतर अमानुल्लाने युरोपचा दौरा काढला व पाचात्य सुधारणांची व लोकसत्ताक राज्यपध्दतीची माहिती गोळा करायचे ठरविले. या सर्व माहितीचा उपयोग आपल्या देशासाठी करण्याचा त्याचा विचार होता. युरोपच्या दौऱ्यास आरंभ करण्यापूर्वी अमानुल्ला हिंदुस्थानात आला. हिंदुस्थानचे व्हॉअीसरॉय आयर्विन, बेझंटबाअी अित्यादी सरकारी बिनसरकारी व्यक्तींनी प्रचंड मेळाव्याने मुंबअीला त्याना सलामी दिली. चित्रशाळेच्या वासुकाका जोशींनीही त्याला मानपत्र दिले. हिंदुस्थानच्या शेजारीच असणाऱ्या स्वतंत्र अफगाण राष्ट्राचा अमीर आणि तोही ब्रिटिशद्वेष्टा, मग लोकांनी त्याचे स्वागत का करू नये? सरकारने शिष्टाचार म्हणून त्याचे स्वागत केले, हिंदी जनतेने स्वयंप्रेरणेने केले. अफगाणिस्थानात परत आल्यानंतर त्याने आपण तयार केलेल्या सुधारणांचा मसुदा अफगाण जनतेपुढे मांडला. या सुधारणांची कल्पना त्याला रशियाकडून मिळाली असावी असा अंदाज आहे. अमानुल्लाने स्वखुशीने आपली सत्ता अफगाण जनतेच्या हाती देण्यास संमती दिली. विश्वविद्यालये स्थापन करण्याचा, स्त्रियांचा पडदा नष्ट करण्याचा निर्णय घेतला व यांमुळे अफगाण जनतेने अमानुल्ला सैतानाचा मोहित असल्याचे जाहीर केले.(विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात हिंदी सरहद्दीवर हा प्रकार घडल्याचे वाचून मुस्लीम राष्ट्रे म्हणून बिचकणाऱ्या हिंदू पुढाऱ्यांना थोडाफार धीर येण्यास हरकत नाही.)

अिस्लाम धर्माचे रक्षण करण्यासाठी बच्चा अी साक्कू नावाचा वीर पुढे आला. रशियाचे वर्चस्व अफगाणिस्थानात होअू देणे ब्रिटिशांना पसंत नसल्यामुळे या पुंडाला त्यांनी हाताशी धरला व अमानुल्लाच्या सुधारणा जाहीर होताच त्याला छू घातले.सनातनी अरबांचा बच्चाने आधीच पाठिंबा मिळवून ठेवला होता. त्याची युध्दसामग्री अद्ययावत असून ब्रिटिश कारखान्यात तयार झालेली दिसत होती. बच्च्याच्या वावटळीला तोंड देणे अशक्य झाल्याने

अमानुल्ला पळून हिंदुस्थानात आला(१९२९). यावेळी हिंदुस्थानात त्याचे स्वागत तर झाले नाहीच, पण बिचाऱ्याच्या मागे पोलीस ससेमिरा लागल्याने मुंबईच्या पथिकाश्रमांत जागा मिळणेही त्याला दुरापास्त झाले. थोड्याच दिवसांपूर्वी त्याला दरबारी स्वागत देणारा आयर्विन आता त्याच्याशी बोलण्यास तयार नव्हता. दैवदुर्विलास म्हणतात तो हा!

यानंतर बच्चा अी साकू आकस्मिकपणे नाहीसा झाल्याने, तो टी अी लॉरेन्स असावा अशी शंका बऱ्याच लोकांनी प्रगट केली. जपानी वृत्तपत्रांनी तसा उघड आक्षेपही केला. काही असले तरी अफगाणिस्थानच्या राजकारणात ब्रिटिशांनी रशियावर मात केली यात शंका नाही. यानंतर ब्रिटिशांनी नादीरशहाला अफगाणिस्थानच्या गादीवर बसविले व त्याला भरपूर आर्थिक मदत दिली. त्याचप्रमाणे काही हत्त्यारे व दारुगोळाही पुरविण्यात आला. नोव्हेंबर १९३३ मध्ये ब्रिटिशांच्या या अफगाण राजाचा खून झाला व त्याचा १९ वर्षांचा मुलगा झहीरशहा त्याच्यामागे गादीवर आला. अिंग्लंड - रशिया यांच्या स्पर्धेमधील अफगाणिस्थान हे एक प्यादे असल्याने त्याला स्वस्थता अशी कधीच लाभत नाही, व राजकारणाला स्थैर्य येत नाही. दुसरे महायुध्द संपले व ब्रिटिशांचे बरेचसे हितसंबंध हिंदुस्थानातून नष्ट झाले. त्यामुळे अफगाण राजकारणातून सर्वस्वी नाही, तरी बऱ्याच मोठ्या प्रमाणात अिंग्लंडने लक्ष काढून घेतले असल्यास आश्चर्य नाही. पण तेथील रशियन वर्चस्व मात्र जरूर वाढीला लागले आहे. अमेरिकेने पाकिस्तानच्या आर्थिक परिस्थितीचा फायदा घेऊन आपले आर्थिक साम्राज्य तेथे प्रस्थापित केल्यास यापुढे अफगाण राजकारण रशिया व अमेरिका यांच्या चढाओढीनुरूप हलविले जाणार यात काडीमात्र शंका नाही. वायव्य सरहद्द प्रांत व तेथील पठाण जनता यांना प्रत्यक्ष त्रास या प्रकरणी सहन करावा तर लागेलच, पण पाकिस्तानही अमेरिकन पैशाच्या मोहाने व निव्वळ दुरभिमानाने या गोत्यात येण्याची प्रत्येक शक्यता आहे.

एक विश्वविद्यालय व चार महाविद्यालये ही या आख्ख्या देशाची बौध्दिक संपत्ती आहे. भूमध्य समुद्राच्या पश्चिम टोकापासून तो तहत हिंदुस्थानच्या सरहद्दीपर्यंत पसरलेल्या या विस्तीर्ण प्रदेशांची अज्ञान व धर्मवेड ही वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळेच युरोपियन राष्ट्रांच्या राजकीय डावात त्यांची हरएक प्रसंगी वाताहातच होत आहे.

गेले कित्येक दिवस मुस्लीम समाज मध्ययुगीन कालखंडात असल्याप्रमाणे वावरत आहे. मुस्लीम धर्माने सांगितलेल्या सामाजिक व वैयक्तिक कायद्यानुरूप शक्यतो जीवन कंठण्याची प्रवृत्ती सर्वच मुस्लीम देशांत दिसून येत होती, व आहे. सुन्नी पंथाचे लोक कालीफला अद्यापि प्रेषित मानतात व सर्वच मुसलमान भाषण, वर्तन बायकामुलांशी वागणूक या गोष्टी तज्ज्ञांनी कुराणाच्या लावलेल्या अर्थानुरूप ठेवतात. 'प्रेषिताने' घालून दिलेल्या रूढीबरहुकूम चालवितात. पण अलीकडे पाश्चात्य राष्ट्रांचे वाढते संबंध मुस्लीम प्रदेशांना ग्रासून टाकण्याच्या विचारात दिसल्याने 'मुस्लीम' जागा होऊ लागला आहे. हिंदुस्थान-अिजिप्तमध्ये ब्रिटिशांनी बस्तान टाकले. पर्शियाच्या आखातावरही त्यांचे प्रभुत्व दिसू लागले. अुत्तर अिराण व तुर्कस्थान यांमध्ये रशियाचे प्रस्थ वाढू लागले, तर उत्तर ऑफ्रिकेत फ्रेंचानी हातपाय पसरले. अिस्लाम जगापुढे दोनच प्रश्न अुभे राहिले. पाश्चात्य सुधारणावादाचा आश्रय करून आपले राष्ट्रीयत्व शाबूत ठेवायचे का जुनाट धर्मप्रवृत्तींच्या मागे लागून पाश्चात्यांच्या भक्ष्यस्थानी पडायचे? १९१४ च्या महायुध्दात तुर्कस्थान, पॅलेस्टाअीन, अिराक, अिराण, अिजिप्त या प्रत्येक ठिकाणी लढाया झाल्या आणि मुस्लीम समाजाला निष्कारण यातना सहन कराव्या लागल्या. दुसऱ्या महायुध्दातही हाच प्रकार घडला. पाश्चात्य राष्ट्रांच्या मगरमिठीतून आपली सुटका होण्याचे चिन्ह नाही असा निराशाजनक विचार मुस्लिम राष्ट्रांच्या मनांत डोकावू लागला. शस्त्रसंधीच्या कालात सीरिया, अिजिप्त आणि अिराक यांमध्ये ब्रिटिश फ्रेंचांनी लष्करशाहीचा धुमाकूळ घातला, तर पर्शिया आणि तुर्कस्थान यांची वाटणीच होण्याची वेळ आली. पण या मगरमिठीतून मोठ्या प्रयासाने मुस्लीम जगाने आपली सुटका करून घेतली. मुस्तफा केमालच्या नेतृत्वाखाली तुर्कस्थानने, व रेझाखानच्या नेतृत्वाखाली अिराणने आपले

स्वातंत्र्य परत संपादन केले. अिजिप्त, अिराक, सीरिया येथील मुस्लीम जनतेनेही राष्ट्रीय झगडा नेटाने चालवून देशाच्या अंतर्गत कारभारात का होअीना पण आपले वर्चस्व प्रस्थापित केले. व युरोपियन राष्ट्रांच्या मगरमिठीत सापडलेले मुस्लीम जग नव्या स्वरूपाने तीमधून बाहेर पडले.

अिस्लाम आता स्वतंत्र आहे; आणि थोडाफार सुधारलेलाही आहे. त्याने आपल्या मध्ययुगीन वागणुकीचा मोठ्या प्रमाणात त्याग केला आहे. हा बदल अितक्या मोठ्या प्रमाणात झाला आहे की, मध्ययुगीन मुस्लीम संस्कृतीच नष्ट झाली म्हणण्यापर्यंत कित्येकांची मजल गेली आहे. मध्यपूर्वेत अिस्लाम संस्कृती आता आपल्या जुन्या स्वरूपात फारशी दृष्टीला पडत नाही. अिस्लाम संस्कृतीच्या निदर्शक जुन्या खाणाखुणा आता क्वचितच नजरेला पडतात.खलीफा नाहीसा झाला. त्याच्या संरक्षणासाठी शब्दांपलीकडे कोणीच धाव घेतली नाही. स्त्रियांचा पूर्वीचा दर्जा जाऊन त्यांना नवा दर्जा प्राप्त झाला. अरबी बाराखडीचे वर्चस्व कमी झाले. पोशाखात सुधारणा झाली. अिस्लाम जगात झालेला हा बदल जरी वरवर असला, त्याची मुळे जरी अद्यापि खोलपर्यंत गेली नसली तरी तो झाला आहे यात शंका नाही. तरीपण मुस्लीम जगात अद्यापि पूर्वीच्याच अेकतानतेने रमजानचे उपवास सुरू आहेत, नमाज सुरू आहेत, मक्केची यात्राहीपण चालू आहे.

धर्मवेड हा मुस्लीम जगाचा विशेष आहे. मुस्लीम जगाचे आणि सहिष्णुतेचे वाकडे आहे. परधर्म परजाती यांबद्दल त्याला फारशी आस्था नाही. परंतु अलीकडे या वृत्तीत जरा बदल पडू लागला आहे. अिराकमध्ये शिया - सुनी अेकत्र काम करताना दिसतात. सुनी आणि झोरास्ट्रीयन्स अिराणमध्ये अेकोप्याने वागताना दिसतात. अिजिप्तच्या कार्यकारी मंडळात मुसलमान व कोप्ट अेकत्र बसतात.

१९३९ च्या महायुध्दाने तुर्कस्थान आणि सौदी अरबस्थानखेरीज बहुतेक सर्व मुस्लीम राष्ट्रे फिरून ब्रिटिश भांडवलशाहीच्या पंजात सापडली व युध्दोत्तर कालात मुक्तही झाली; पण मध्यंतरीच्या कालात रशिया व अमेरिका या दोन राष्ट्रांची वर्दळ या प्रदेशांत अितकी वाढली की, मध्यपूर्वेतील राष्ट्रे ही आता भावी महायुध्दातील युध्दभूमी म्हणून वापरली जातात की काय अशी भीती निर्माण झाली आहे. गेल्या दोन महायुध्दांनी युरोपच्या भूमीचे संपूर्ण चंदन झाले आहे, ते 'भाग्य' आता या भूमीला लाभू नये ही मनीषा असल्यास आता या मध्ययुगीन राष्ट्रांनी धर्माचे वेडेचार सोडून आशियातील सर्व राष्ट्रांकडे संधान बांधून प्रभावी असा एक आशियातील राष्ट्रांचा संघ बनविण्यात भाग घेतला पाहिजे. नाहीतर अल्लाच त्यांचे रक्षण करो!

●●●